
१९६०२
म. ग्रं. सं. ठाणे
विषय के-प्र ॥२१
सं. क्र. ५७७८.

# जसोदा



REFBK-0018692



प्रथम मुद्रण
ऑक्टोबर १९७२

सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशक
नरिंदर मलिक
इण्डिया पब्लिशिंग हाउस.

प्रमुख कार्यालय
कामदार चेंबर
शीव (पूर्व), मुंबई २२.

ब्रँच कार्यालय
३० बी, प्रल्हाद मार्केट,
करोल बाग, नवी दिल्ली ५.

मुद्रक
प्रभाकर सिद्ध
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार पेठ, पुणे ३०.

किंमत
रु. २·७५

# वाचकांस

कोणत्याही देशात तेथील नद्यांना अत्यंत महत्त्व दिले जाते. जनमानसात त्यांच्याबद्दल इतका आदर असतो की, त्यांना 'आई' म्हणून संबोधले जाते.

आमच्या देशात नद्यांना फार मान दिला जातो. गंगेच्या पाण्याला इतके पवित्र मानण्यात येते की, लोक हे गंगाजल घरातील देवघरात सांभाळून ठेवतात.

आमच्या मोठ्या नद्यांमध्ये नर्मदेला वरचे स्थान आहे. त्याचेच वर्णन या पुस्तकात आहे. नर्मदा कुठे उत्पन्न होते, कुठे जाऊन समुद्राला मिळते, तिच्या किनाऱ्यावर कोणकोणती तीर्थक्षेत्रे आहेत, किती जमिनीला ती नवजीवन देते, तिच्याकडून संस्कृतीच्या वाढीला लागलेला हातभार आदिसंबंधी सर्वांगीण माहिती अत्यंत मनोरंजक शैलीमध्ये या पुस्तकात सांगितली आहे.

आपण हे जरूर वाचा व इतरांना वाचण्यास द्या.

— लेखक

# प्रकाशकीय

प्रत्येक देशाच्या विकासाच्या कामी तेथील नद्यांचा फार मोठा हातभार प्राचीन काळापासून सतत लागला असल्याचे आढळून येते. दळणवळणाची साधने नव्हती तेव्हा तर नद्यांमधून नावांच्या साहाय्याने वाहतूक चालत असे. संस्कृतीच्या विकासाच्या कामी नद्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे, आणि आपल्या मुलाबाळांचे त्यांनी शत्रूपासून नेहमीच रक्षण केले आहे. इतकेच नव्हे, तर आपल्या पाण्याच्या मदतीने अन्न पैदा करून त्यांनी मुलाबाळांचे पालनपोषण केले आहे. म्हणूनच पुरातन काळातील ऋषि-मुनींनी नद्यांना लोक-माता म्हणजे लोकांचे संगोपन करणारी आई, अशी संज्ञा दिलेली आहे.

नद्यांची ही श्रेष्ठ दर्जाची उपयुक्तता ध्यानात घेऊनच स्वातंत्र्या-नंतर भारत सरकारने नद्यांचा अधिक उपयोग करून घेण्यासाठी प्रत्येक मोठ्या नदीवर धरणे बांधण्याच्या योजना तयार केल्या. आमच्या देशाचे दिवंगत प्रधानमंत्री कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी म्हटले होते की, " ह्या नदी-योजना स्वतंत्र भारतातील पावन तीर्थ-क्षेत्रे होत. ती आमच्या देशाच्या प्रगतीची प्रतिबिंबे आहेत "

अन्य देशामध्ये नद्यासंबंधी जाडे जाडे ग्रंथ तयार झाले आहेत. व्यक्तींप्रमाणेच नद्यांचीही जीवन-चरित्रे मोठी मनोरंजक असतात. पण आमच्या देशात अजून नद्यांवर सविस्तर लिहिण्याचा प्रयत्न अद्याप झालेला नाही.

वरील वस्तुस्थिती ध्यानात घेऊन नदी-परिचय-मालेचा हा उपक्रम योजिलेला आहे. या मालेतील प्रत्येक पुस्तक त्या त्या नदीसंबंधीचा ज्ञानकोशच होय, असे म्हणता येईल. भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक दृष्टिकोणाबरोबरच ज्ञानवृद्धीची दृष्टी समोर ठेवून ही पुस्तके लिहिली आहेत सुबोध व मनोरंजक शैलीत हिंदीमध्ये लिहून प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचा मराठी अनुवाद वाचकांच्या सेवेस सादर करीत आहोत.

ही पुस्तकमाला समाजातील विविध थरांच्या वाचकवर्गास आवडेल अशी खात्री वाटते. मालेतील पुस्तके स्वत. वाचल्यावर इतरांनाही ती वाचण्यास प्रवृत्त करणे उचित होईल.

— प्रकाशक

७९९६७
५०४
१.२.८३ १८६

## नर्मदा : १

उन्हाळ्याचे दिवस फार त्रासदायक असतात. या ऋतूमध्ये सूर्य खूप आग बरसतो. दिवसभर गरम वारा वाहतो. जमिनीवरील सर्व प्राणी बेचैन होऊन जातात. झाडे-झुडपे धगधगणाऱ्या उन्हाने सुकून जातात. जमिनीचा कण अन् कण भट्टीतील चण्याप्रमाणे भाजून निघतो ! जमीन तहानेने व्याकूळ होते. निसर्गाला तिची दशा पाहवत नाही. जमिनीची तहान भागवण्यासाठी वर्षाऋतू धावत येतो. तो आमूलाग्र परिवर्तन घडवून आणतो,—आपल्या सर्व सवंगड्यांसह !

वर्षाऋतूचे आगमन होते. नवीन नवीन ढग आकाशात गोळा होतात. त्यांच्या गर्दीने आकाश अंधारून जाते. थंड वारे वाहू लागतात. विजा चमकू लागतात. ढग गडगडाट करू लागतात. ढगांचा गडगडाट ऐकून लहान मुलांचे काळीज भीतीने धडधडू लागते. ते आपल्या बालबुद्धीने ठरवतात की, आकाशात नक्कीच मोठी लढाई होत आहे, आणि या तलवारी चमकत आहेत. कधीकधी ते असाही विचार करतात, 'काळेकभिन्न राक्षस भयंकर रूप धारण करून पळत आहेत, व भगवान इंद्र व इतर देव त्यांचा पाठलाग करत आहेत !' पळापळ, गडगडाट, विजांचा चमचमाट हे सर्व थांबते. आकाशात ढग शांतपणे वेगवेगळे

आकार धारण करून शांत बसतात आणि चंद्र या ढगा-आडून डौलाने पुढेपुढे जाताना दिसतो. तेव्हा मुलांना वाटते, जणू चांदोबा त्यांच्याशी आंधळी कोशिंबिरीचा खेळ खेळत आहे !

याचप्रमाणे पृथ्वीचा नकाशा घेऊन गमतीने पाहिले तर देशादेशांचे आकार खूप मजेदार भासतात. एखादा देश अस्वलासारखा वाटतो तर एखादा वाघासारखा ! जणू तो खाद्याची वाट पाहात आहे ! एखादा कांगारूसारखा-की ज्याने छातीशी आपल्या बच्चाला पकडले आहे !

आम्ही आमच्या देशाच्या नकाशावर नजर टाकली तर असे वाटते, कोणी महापुरुष आपल्या लांबलांब जटा पसरून तपश्चर्या करण्यासाठी बसलेला आहे ! कधी असेही वाटते, मोरमुकुट धारण केलेला कृष्णकन्हैय्या सुंदर रूप धारण करून बासरी वाजवत उभा आहे ! परंतु चित्रामध्ये मात्र भारतमाता मंद मंद हास्य करीत उभी असलेली दाखवली आहे. तिच्या आकाशाचे चुंबन घेणाऱ्या कपोलावर,-हिमालयावर, बर्फाचा मुकुट शोभून दिसतो आहे. शरीरावर तिने वाऱ्यावर लहरणाऱ्या हिरव्या शेतांची हिरवीगार साडी परिधान केली आहे. खाली दक्षिणेला समुद्र आपल्या लाटांनी तिचे चरणपूजन करतो आहे. हिन्दी महासागराला त्याच्या या शुभकार्याबद्दल गर्व आहे. अभिमान आहे. भारतमातेच्या कंबरपट्ट्याचे रूप घेऊन चमचमणाऱ्या

हारासारखी मेखला बनून नर्मदा शोभून दिसते आहे. परंतु भाविक भक्तांच्या नजरा जेव्हा तिच्याकडे वळतात तेव्हा ती भगवतीचे रूप धारण करते व त्यांना सामोरी येते.

अनेक ऋषिमुनी आणि देवता तिची स्तुती करत आहेत. तिच्या एका हातात भगवान ओंकाराचे शिवलिंग असून त्यावर ती दुसऱ्या हाताने कमळे वाहात आहे . . . ही कवीची एक कल्पना नाही, थंड देशांत– जिथे पहाडांची शिखरेच नव्हेत तर नद्या व झऱ्यांचे पाणीही गोठून जाते, जमीनही बर्फाने झाकून जाते, तेथे नद्यांचे रूप कदाचित आनंददायक वाटत नाही. परंतु भारतासारख्या उष्ण हवामानातील देशात नदी ही तर जीवनदायिनी आहे– आईसमान आहे. ती आपल्या अमृततुल्य जलाने आपल्या मुलांबाळांचे, लाखो–करोडो जीवांचे काही भेदभाव न करता पालनपोषण करते. प्राचीन काळी आमच्या पूर्वजांनी नद्यांची महती गाइली आहे. आपल्या जीवनाचा बळी देऊन असंख्य लोकांचे पालनपोषण करणाऱ्या या नद्यांना त्यांनी ‘लोकमाता’ ही पदवी दिली आहे, ती योग्यच आहे. महाभारतातील भीष्मपर्वामध्ये या गोष्टीला पुष्टी दिली आहे :

> विश्वस्य मातरः सर्वाः
> सर्वाश्चैव महाफलाः ।
> इत्येताः सरितो राजन्
> समाख्याता यथास्मृति ॥

गंगा-यमुनेपासून दूर राजस्थानातील कडक व कोरड्या वाळवंटातून आम्ही जेव्हा दक्षिणेला येतो, तिथे दूरवर पसरलेल्या विंध्याचल पर्वताच्या रांगा ओलांडून नर्मदेच्या तीरावर पोहोचतो, तेव्हा वाटते— जणू आम्ही खरेखुरे आईच्या प्रेमळ सावलीमध्ये आलो आहोत! दक्षिणेहून सातपुड्याच्या दुर्गम रांगा पार करून आम्ही तिथे येतो तेव्हाही असेच वाटते. नर्मदेचे रूप फारच सुंदर व सुख-दायक आहे. तिचे दोन्ही किनारे वा काठ फारच रमणीय आहेत. ते दाट जंगले, लहानमोठे डोंगर, झाडेझुडपे, आणि मैदानांनी बनलेले आहेत. अगणित छोटे मोठे झरे खळ-खळत येऊन तिची शोभा जास्तच वाढवतात. तिचा प्रवाह साधा, सपाट नसून तो कुठे उंच, कुठे खाली, काही ठिकाणी खोल, वाकडातिकडा, अरुंद, उथळ, कुठे घन-गंभीर, तर कुठे तुफानासारखा आहे. काही ठिकाणी तो डोंगरांमुळे छोट्याछोट्या प्रवाही धारांतून वाटला गेला आहे. कुठे तो असा बनला आहे की— हरीण किंवा माकड एका उडीत तो पार करतील व पुढे जातील!

नर्मदेला 'मंदिराची नदी' म्हटली जाते. हिच्या किनाऱ्या-वर जितकी मंदिरे आहेत तितकी कुठल्याही नदीकिनाऱ्यावर दिसणार नाहीत. तेथे मंदिरांचे कळस झाडाआडून चमक-ताना व त्यांवरील पताका फडफडताना दिसतात. नर्मदा पूर्वेकडून पश्चिमेकडे गेली आहे. त्यामुळे दिवसभर तिचे

रूप मनोहर दिसते. सकाळी सूर्योदयाचे व संध्याकाळी सूर्यास्ताचे दृश्यही फार भव्य दिसते. साऱ्या जगात नदी-नाल्यांमध्ये छान असलेली ही अशी एकच नदी आहे. त्यामुळे यात्रिक तिची यात्रा हजारोंच्या संख्येने बारा महिने करीत असतात. यात्रिक म्हणतात, नर्मदा-मातेच्या किनाऱ्यावर यात्रा करताना मनुष्याला थकवा जाणवतच नाही ! अपार समाधान व आनंदच या नर्मदा परिक्रमेतून यात्रिकाला मिळतो. नर्मदेची स्तुती वेद आणि पुराणांतून केलेली आहे. तिचे पाणी गंगा-यमुनेच्या जलाप्रमाणेच पवित्र मानले जाते. यासाठी नर्मदेला 'मध्य देशाची गंगा' म्हटले जाते. गंगामातेच्या जला-प्रमाणे हिचे जलही फार लाभदायक व पवित्र आहे. हिच्या जलाने भाविक जेव्हा स्नान करतात तेव्हा या लोकमातेविषयीची असीम श्रद्धा त्यांच्या चेहऱ्यांवर झळकताना दिसते, व ते गात असतात, 'नर्मदे हर ! नर्मदे हर !' कवीही या पवित्र नदीच्या गुणगानात लिहून जातात—

'जयति नर्मदा परमपुण्य तोय प्रवाहिनी ।
सिद्ध शिवमयी शुभ सुमंगला गाती प्रदायिनी ।।

आई नर्मदेची परिक्रमा करणाऱ्या यात्रिकांच्या पाच पाच, दहा दहांच्या टोळ्या असतात. काही महापुरुषांच्याबरोबर १००-२०० यात्रिक व भक्तगण परिक्रमा करत असतात. त्यांना 'जमात' म्हणतात !



‘ भक्ताची जम्मात ’

अशीच जुनी आणि प्रसिद्ध जम्मात श्रीगौरीशंकर महाराजांची आहे. त्यामध्ये शेकडो साधू आहेत. जुन्या गादीधारी महन्तांसारखा त्यांचा थाटमाट असतो. हत्ती, घोडे, तंबू, डंका, निशाण हे सर्व त्यांच्याबरोबर असते. त्यांचे खाणेपिणे भक्तांकडूनच होते. याशिवाय बरोबर काही सामान असत नाही. भक्तमंडळी कधी कधी या लोकांना खाण्यासाठी सुंदर सुंदर वस्तू देतात. परंतु जमातीचे मुख्य लोक पंचकणिकेचे 'टिक्कड' नावाचे पदार्थच खातात. जमातीच्या संध्याकाळच्या पूजेचे दृश्य व नाद फार आकर्षक व वैराग्यदायक असतो. ही जमात इतर [illegible]ांप्रमाणे चातुर्मास सोडून कुठेही जास्त दिवस राहात नाही.

या साऱ्या यात्रिकांपासून नदी-किनाऱ्यावरील गावांना सहजच फायदा होतो. त्यांचा प्रभाव नदी-किनारी राहणाऱ्यांवर खूपच होतो. यातील गोष्टीमुळे संस्कृती व संस्कार निर्माण होतात, आणि कालानुरूप त्यातील परिवर्तन अनुकूल रूप धारण करते. यासाठी आमच्या देशाच्या संस्कृतीमध्ये नद्या– विशेषतः नर्मदा नदीस अत्यंत पवित्र मानले आहे.

ग्रामे वा यदि वाऽरण्ये पुण्या सर्वत्र नर्मदा।

अशी पुराणांतून हिची स्तुती केली आहे. केवळ वाचून व ऐकून भाविकांच्या मनांमध्ये जर इतकी श्रद्धा निर्माण होते

तर जो स्वत: तिथे नर्मदा-तीरावर जाऊन आपल्या चक्षूंनी नर्मदा-तीरावरील मंदिरे व तीर्थांचे दर्शन घेतो त्याला अवर्णनीय आनंद व सुख मिळत असणार यात शंका नाही ! भारतातील अत्यंत पवित्र नद्यांपैकी नर्मदा एक नदी आहे. त्यामुळे नर्मदा परिक्रमा करणे हे अति पुण्यदायक मानले जाते. नर्मदेचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य असे की, तिच्या किनाऱ्याने कितीही चालत राहिले तरी माणूस कंटाळून जात नाही. तिच्या दोन्ही बाजूंना फळे, फुले, कंदमुळे आदी भरपूर खाण्यासाठी मिळते. जागोजाग नवी-जुनी मंदिरे आहेत. दाट सावली देणारे वृक्ष आहेत. सर्व-प्रांतीय लोकांची वस्ती आहे. त्यांचे वेगवेगळे रीतिरिवाज दृष्टीस पडतात, वेगवेगळ्या भाषांतील बोल ऐकू येतात. काही नवीन शिकायला मिळते, पाहायला मिळते. इतके सर्व असल्यावर कोणाला कंटाळा येईल ?

नर्मदेच्या किनाऱ्याचा थाट वेगळाच आहे. संध्याकाळी जेव्हा अंधार होतो, तेव्हा किनाऱ्यावरील गावांतील मंदिरांतून दीप लावले जातात आणि आरतीच्या घंटेचा आवाज येऊ लागतो. घाटावरील भाविक जणू 'त्वदीय पाद पंकजं नमामि देवि नर्मदे' म्हणून स्तोत्र म्हणत आहेत असे वाटू लागते, आणि दूरवर त्याच वेळी पहाडांच्या मधून वाहणारा नर्मदेच्या प्रवाहाचा ध्वनी वातावरणाची गंभीरता जास्तच वाढवतो.

## नर्मदा : २

नर्मदा भारतातील प्राचीन नद्यांपैकी एक आहे. वेद आणि पुराणांची पाने तिच्या स्तुतीने भरलेली आहेत. गंगा, गोदावरी आणि यमुनेनंतर त्यांनी नर्मदेची शोभा आणि उपयोगिता यांवर स्तुतिसुमनांचा वर्षाव केला आहे. नर्मदेच्या किनाऱ्यावर शिव आणि विष्णू दोघांचे भक्त एकत्र आराधना करतात. केवळ उत्तरेचेच नव्हे तर दक्षिणेतील अनेक ऋषी-मुनींनी आणि पुण्यात्म्यांनी भगवंताची स्तुती येथून केलेली आहे. तिच्या तटावर उत्तर आणि दक्षिण दोन्हीकडील लोकांनी प्रेम आणि मित्रता वाढवून एकतेचा परिचय करून दिलेला आहे.

नर्मदा नदी कुमारिका आहे असे म्हटले जाते. तिचा विवाह झालेला नाही. ती सगळ्यांपासून वेगळी आणि उलटी वाहते. आमच्या देशातील सर्व नद्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतात, परंतु नर्मदा ही एकच नदी आहे,–जिचा प्रवाह पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहतो. वेदकाळापासून आजपर्यंत या नदीला सन्मान मिळालेला आहे. साधारण सर्व प्राचीन ग्रंथांमधून नर्मदा नदीची स्तुती केलेली दिसते. कोणी तिला भगवान शंकराच्या तेजापासून उत्पन्न झालेली मानले आहे, तर कोणी तिला शिवाचेच एक रूप मानलेले आहे.

असं सांगतात की, नर्मदेनं पृथ्वीवर येण्यापूर्वी अनेक शतकं ब्रह्मदेवाची उपासना केली. शेवटी जेव्हा तपश्चर्या पूर्ण झाली तेव्हा ब्रह्मदेवानं वर मागण्यास सांगितलं. तेव्हा नर्मदा हात जोडून म्हणाली,

" हे प्रभो, जमिनीवर वाहणाऱ्या नद्यांमध्ये गंगा, यमुना आणि सरस्वतीला अत्यंत पवित्र मानलं जातं. त्यांना मोक्षदायिनीही म्हटलं जातं. त्यांचं महत्त्व आणि गुणांच्या चर्चेत सर्व ग्रंथ सहभागी आहेत. लोकांच्या मनांत त्यांच्या-बद्दल अपार श्रद्धा आहे. लोक या नद्यांत स्नान करणं अत्यंत पुण्यकारक समजतात. इतकंच नाही, तर यात्रिक आपल्या घरी गंगाजल घेऊन जातात. मृत्युशय्येवरील मानवाच्या मुखात गंगाजलाचे थेंब टाकतात, कारण त्यामुळं संसारातील सर्व गोष्टींपासून मुक्ती मिळते व स्वर्गप्राप्ती होते . . ."

" शेवटी तुझी इच्छा तरी काय आहे ? " ब्रह्मदेवानं मध्येच अडवून नर्मदेला विचारलं.

" या सर्व नद्यांबद्दल जी श्रद्धा, विश्वास जनमानसात आहे तसा सन्मान, आदर मला मिळावा,–येवढीच माझी इच्छा आहे. " नर्मदा म्हणाली.


ब्रह्मदेव ही इच्छा ऐकून नर्मदेची समजूत घालू लागले. " बाळ, पाची बोटं सारखी नसतात. त्याप्रमाणंच दुसऱ्या

कोणाशी अशी बरोबरी करू नये. प्रत्येकाचं वेगळं आगळं असं वैशिष्ट्य असतं. स्वतंत्र महत्त्व असतं."

ब्रह्मदेवाचे हे बोलणे ऐकून नर्मदेचे समाधान झाले नाही. ती त्यांना काहीच बोलली नाही. त्यांना नमस्कार करून गुपचूप तेथून निघून गेली. तिला चैन पडेना. आणि पडेलच कसं? कारण गंगा-यमुनेच्या बरोबरीचा दर्जा प्राप्त करून घेण्याची महत्त्वाकांक्षा तिला सतावत होती. एक दिवस खूपच बेचैन होऊन ती एकान्तातील जागेच्या शोधा-साठी निघाली. चालत चालत ती काशीला पोचली. तिथं विश्वेश्वराच्या— महादेवाच्या दर्शनानं तिच्या मनात आशा निर्माण होऊन तिथंच विश्वेश्वराच्या मंदिरात बसून ती जप करू लागली. नर्मदा तप करण्यामध्ये गुंग होऊन गेली. तिनं खूप कठोर तप आरंभले. तिच्यापुढं गंगेच्या तपाचं उदाहरण होतं. एकच एक उद्देश मनात होता. एकच आस लागली होती. एकाच उत्कट इच्छेनं तिचं मन व्यापून गेलं होतं : महादेवाचं आसन हालवून सोडायचं आहे. महादेवाच्या मनाला जागं करायचं आहे. काशी-विश्वेश्वराला प्रसन्न करायचं आहे. नर्मदेनं निश्चय केला की, हे मी करीनच. तिनं मनाला बन्ध घातला व ती एकाग्रतेनं तप करू लागली. आत-बाहेर, वरती-खाली, सर्वत्र तप, तप— आणि तपच भरून राहिले होते. जणू काही नर्मदाच तप होऊन गेली होती, आणि तप ही जणू नर्मदा झाली होती!

इंद्राची अप्सरा उर्वशी त्या वेळी आज्ञा घेऊन तिथे घेऊन पोहोचली. उर्वशीने नर्मदेला पाहिले,– एक अत्यंत तेजस्वी युवती आपल्या तपात बुडून गेलेली !– जिला बोलायला वेळ नाही, एकाग्रतेने जपमग्न झालेली, इकडे तिकडे बघायला तयार नसलेली,–अशी तिला दिसली. तिने नर्मदेला पुन्हा एकदा पाहिले व आपले मोहमयी जाळे पसरावयाला सुरुवात केली. इंद्राचा हुकूम घेऊन अलकाही उर्वशीला मदत करण्यासाठी तिथे आली. त्या दोघींनी नर्मदेच्या चारी बाजूंस वसंत फुलवला ! पक्षी किलबिल करू लागले. कळ्या उमलू लागल्या. मंद वारा वाहू लागला. लतावेली फुलून गेल्या, व वृक्षांना बिलगल्या. कुंज हसू लागले. हळूहळू गाऊ लागले. सगळीकडे यौवन बहरून उठले. दोन्ही अप्सरा नाचू लागल्या. त्यांनी मोहिनी-माया पसरली. फुलांचे बाण मारले. नर्मदेचा तपोभंग करण्यासाठी हरतऱ्हेने प्रयत्न केले;– परंतु त्यांची इच्छा अपुरी राहिली. जेव्हा उर्वशीने मायाजाल पसरले तेव्हा नर्मदेच्या तपाचे तेज अधिकच वाढले. अलका मोहिनी घालू लागली तेव्हा नर्मदेची एकाग्रता अधिक वाढली. दोघी उदास झाल्या. अप्सरा हार मानून परत गेल्या. त्यांच्या परत जाण्याने महादेवाला करुणा आली. ते प्रकट झाले व म्हणाले,

“मुली,– वर माग ! वर माग !”



महादेव म्हणाले, " मुली,– वर माग ! "

नर्मदेने शिवाला नमस्कार केला व म्हणाली,

" प्रभू, जर आपण माझ्यावर प्रसन्न झाला असाल तर गंगा-यमुनेप्रमाणं माझा सन्मान होईल असा मला आशीर्वाद द्या. मला इतकी शक्ती द्या,– की माझ्या जलानं स्नान करणाऱ्या भक्तांची पापं धुऊन जातील. त्यांच्यासाठी मी ' मुक्तिदायिनी ' ठरेन, असा आशीर्वाद द्या. "

महादेवाने शांतपणाने नर्मदेचे बोलणे ऐकले व प्रसन्न होऊन तिला वरदान दिले.

" हे नर्मदे, तुझी इच्छा पूर्ण होईल. गंगा, यमुना आणि

सरस्वतीमध्ये स्नान करण्यानं लोकांना जे पुण्य मिळतं ते फक्त तुझ्या दर्शनानं प्राप्त होईल."

—आणि त्या दिवसापासून नर्मदा पृथ्वीवर मानव-कल्याणासाठी प्रकट झाली.

नर्मदेच्या जन्माची ही कहाणी आग्नेय पुराणात लिहिलेली आहे. अजून एक कहाणी स्कंद पुराणात बघायला मिळते. नर्मदेच्या उत्पत्तीच्यासंबंधीच्या या दोन्ही कहाण्या एकमेकांपासून एकदम भिन्न आहेत. स्कंद पुराणात एक कहाणी आहे ती अशी :

चंद्रवंशातील चक्रवर्ती राजा पुरूरवा अत्यंत प्रतापी सम्राट व योगी पुरुष होते. तपश्चर्येसाठी त्यांची विशेष ख्याती होती. त्यांनी अनेक वेळा मोठमोठे यज्ञयाग व जप-तप केले होते. महान ऋषिमुनीही त्यांना आदरणीय मानत असत.

एकदा देशात मोठा दुष्काळ पडला. लाखो लोक भुकेने, तहानेने मेले. लाखो पशुपक्षी, जनावरे चाऱ्याअभावी तडफडून मेली. अन्न-पाणी नसल्याने अनेक प्रकारच्या साथी पसरल्या. राजा पुरूरवा काळजीत पडला. तेव्हा ज्ञानीजनांनी राजाला सांगितले,

" नर्मदा कुमारिका आहे, त्यामुळं तिच्यामध्ये खूप आत्मबळ व शक्ती आहे. नर्मदेमध्ये तपाचं तेज आहे. तिन्ही लोकांना पवित्र करणारी ती नदी आहे. ती अनेक

रोगांतून मुक्ती देऊ शकते. त्या पुण्यदायिनी नर्मदेचं पृथ्वीवर आगमन होणं आवश्यक आहे. तरच या अडचणी दूर होतील; परंतु ती स्वर्गनिवासी नदी आहे. तिला जमिनीवर कसं आणता येईल ?"

त्या वेळी नारदमुनी तेथे उपस्थित होते. ते म्हणाले,

" नर्मदेला जमिनीवर आणण्यासाठी एकच उपाय आहे; परंतु तो फार कठीण आहे !"

" कोणता उपाय ? लवकर सांगा देवर्षी,–आपण सांगाल ते मी करीन !" पुरूरव्याने उत्सुकतेने विचारले.

" शिवाची उपासना करून नर्मदेला भू-लोकी आणता येईल." नारदमुनी म्हणाले.

" तर मग मी जरूर तप करीन !" राजा म्हणाला.

त्या दिवसापासून कैलास पर्वतावरील एका वृक्षाखाली बसून राजा पुरूरवा कठोर तप करू लागला. ते कठोर तप बघून ऋषिमुनीही चकित झाले ! राजा पुरूरव्याच्या कठोर तपश्चर्येपुढे सर्व नतमस्तक झाले. महादेव प्रसन्न होऊन राजाला म्हणाले,

" वर माग– राजा !

" मानव-कल्याणासाठी आपण नर्मदेला भूमीवर पाठवा. त्यामुळं प्रजेचं दुःख निवारण होईल." राजाने हात जोडून प्रार्थना केली.

हे ऐकून महादेव चिंतामग्न झाले व म्हणाले,

" हे राजा, हे काम अत्यंत कठीण आहे; कारण तिला प्रचंड शक्ती व वेग आहे. तिच्या आगमनानं जमीन फाटून तिचे तुकडे तुकडे होतील, आणि पर्वत डोलू लागतील !"

" महादेवा, तू सर्वशक्तिमान आहेस. तुम्हीच असं म्हटलं तर हजारो दीनदुबळ्यांचं कसं होईल ? तुम्हांला कुठलंच काम अशक्य नाही. आपण मनात आणलं तर हे काम जरूर होईल." राजाने हट्ट धरला.

" नर्मदेचा भार कोण सहन करू शकेल ?" महादेवाने आठ मोठ्या पर्वतांना बोलावून विचारले. कुणाचेंही साहस होईना. शेवटी विंध्याचल पर्वताने आपल्या पर्यंक नावाच्या मुलाला ते काम सांगितले. पर्यंक पर्वत नर्मदेला सांभाळण्यासाठी तयार झाला. तेव्हा महादेवाने नर्मदेस भूमीवर जाण्याची आज्ञा दिली. आदेश मिळाल्यावर नर्मदेने आकाशातून उडी मारली. नर्मदा आकाशातून उतरली तेव्हा आकाश पाण्याच्या फवाऱ्याने भरून गेले. रंगीबेरंगी ढगांनी गर्जू लागले. ती उतरली तेव्हा लाखो ढग एकमेकांवर आदळून प्रचंड आवाज झाला. नर्मदा उतरली ती अशी— की जणू एखादा तारा आकाशातून पडत आहे, अग्नी कोसळत आहे, वीज पडत आहे ! तिच्या कडकडाटाने आकाश कापू लागले, दिशा थरथरू लागल्या, पर्वत हालू लागले, धरती डगमगू लागली ! नर्मदा उतरली, अन् देवता घाबरून गेल्या. सर्वांनी भीतीने कामे थांबवली. नर्मदेने आवेगाने आकाशातून खाली उडी मारली. तिची

१८६५२



नर्मदेने आकाशातून उडी मारली

उडी इतकी भयंकर होती की– धरती थरथरू लागली ! तिचा प्रवाह एवढा अजस्र की लाख प्रयत्न करूनही त्याला सांभाळणे शक्य झाले नाही. सर्व भूमीवर पाणीच पाणी झाले.

हे सर्व पाहून लोकांनी शिवाला विनंती केली. त्या संकटातून वाचवण्यासाठी ते प्रार्थना करू लागले. तेव्हा शिवाला दया येऊन नर्मदेचा प्रवाह त्याने आपल्या शक्तीने कमी केला. आता नर्मदा सामान्य रूपाने वाहू लागली.

पुराणातील या दोन कथा वाचून हे स्पष्ट होते की, नर्मदेचे आगमन लोकांच्या भलाईसाठी झाले आहे. अनादी कालापासून नर्मदा ही मानवाची सेवा करीत आहे, यात थोडीही शंका नाही.

---

# नर्मदा : ३

नर्मदामैय्या ही आमच्या प्राचीन संस्कृतींची निर्मिती व जतन करणारी नदी आहे. तिने फक्त प्रसार केला नाही तर– दक्षिण भारत व उत्तर भारत यांतील आर्य संस्कृती व द्रविडी संस्कृती यांचा मिलाफ घडवून आणला आहे. हिच्याच जवळपास आमच्या आदिवासी बंधूंची संस्कृती विकास पावली आहे.

पृथ्वीवर मानवाचा जन्म १० लाख वर्षांपूर्वी झाला असे मानले जाते. परंतु देशात जागोजागी जे उत्खनन झाले, त्यातून मानवाच्या ५–६ लाख वर्षांपूर्वीचा प्रगतीचा मागोवा घेता येतो. या सर्व उत्खननातून अनेक गोष्टींचा बोध होतो. मानव जेव्हा जंगली अवस्थेत होता तेव्हा त्याने आपली पहिली वस्ती नर्मदेच्या आस-पास केली होती. या प्रदेशात केलेल्या उत्खननात आदि-मानवाची ऐरण इत्यादी हत्यारे सापडली. ही हत्यारे हा अति प्राचीनकालीन मानवाच्या नर्मदाकाठच्या वस्तीचा पुरावाच होय. नर्मदेच्या किनाऱ्यावर व जवळपासच्या खोदकामांत अनेक वेगवेगळ्या वस्तू मिळाल्या. तऱ्हेतऱ्हेची दगडाची हत्यारे बघून हे समजून येते की, आदि-मानवाने दगड छिनून सुरी, कुऱ्हाड असे त्यांस आकार दिले. त्यांचा


उपयोग तो शिकारीसाठी करत होता. सहज नजर टाकल्यास हे दगड व इतर दगड यांत काहीच फरक दिसत नाही, परंतु लक्षपूर्वक बघितल्यास दगडांना फोडून, घासून धार केलेली दिसते, व नक्कीच कोणी मानवाने या दगडाला हे रूप मोठ्या कष्टाने मिळवून दिले आहे हे लक्षात येते. या आधारावरून भारतात हजारो वर्षांपूर्वी राहणारा मानव हा काम करीत होता असे म्हणता येते.

येथे खोदकामात सापडलेली हत्यारे, भितीचे अवशेष यांवरून हे सिद्ध होते की, आदि-मानवाने नर्मदाकाठीच आपली वस्ती केली होती. भिंतीच्या अवशेषांवरून भिंती उभारण्याची कला त्याला अवगत होती हेही सिद्ध होते. तसेच यावरून नर्मदेच्या अस्तित्वाची प्राचीनताही सिद्ध होते.

नर्मदेच्या परिसरात बालाघाट जिल्हा आहे. येथे खूप खोदकाम केले आहे. या खोदकामात आदियुगातील औजारे व दागिन्यांचा साठा सापडला आहे. या वस्तू अश्मयुगातील आहेत. भारतातील आदि-मानवाचा सर्व-प्रथम निवास नर्मदाकाठी होता हेच यावरून सिद्ध होते. आदि-मानव हा येथे वेगवेगळ्या गटाने वा समुदाय करून राहात होता. या वेगवेगळ्या दोन समुदायांमध्ये वा गटांमध्ये शत्रुत्व होते असे येथील खुणांवरून समजते. ते वेगवेगळे गट एकमेकांवर आक्रमणही करत असावेत.

आक्रमणास हत्यारांसह तयार राहणाऱ्या आदि-मानवाने संरक्षणासाठी भिंती वा तटांसारख्या कालान्तराने प्रचलित झालेल्या गोष्टींची निर्मिती केली. नर्मदा-घाटावर राहणाऱ्या आदि-मानवांची टोळी सर्वांत सभ्य व सुसंस्कृत होती. आपल्या अस्तित्वाचे विचारपूर्वक रक्षण करण्याची व नवनिर्मिती करण्याची त्यांची कुवत होती, हे समजून येते. नर्मदा-काठावरील खोदकामात सापडलेली संरक्षक तटबंदी वा भिंत ही जगातील अश्मयुगीन अवशेषांतील सर्वांत प्रगत वस्तीची खूण आहे.

नर्मदा-काठावर जिकडे तिकडे आदि-मानवाने निर्माण केलेली चित्रे गुहांतून सापडतात. पंचमढी, भोपाळ, होशंगाबाद, कैमोर, जोगामारा येथे अनेक जागा सापडतात,—जेथे अति प्राचीनकालीन गुहांतून आदि-मानवाने कोरलेली भित्तिचित्रे आहेत. या चित्रांतून भडक रंग वापरले आहेत. ते भडक रंग म्हणजे तत्कालीन कठोर जीवनाचे प्रतीकच होय. या चित्रांतील मुख्य विषय 'शिकार' अथवा 'मानवाचे पशूबरोबर युद्ध' हा आहे. प्राचीन युगातील मानवाचे सर्वांत मोठे शत्रू हे हिंस्र पशू होते. मानवाचा सर्वांत अधिक वेळ हा भूक भागवण्यासाठी शिकार करण्यात व हिंस्र पशूपासून स्वतःचे संरक्षण करण्यात जात होता. अर्थातच वास्तव जीवनाचे प्रतिबिंब त्याच्या चित्रातून आदि-मानवाच्या दैनंदिन जीवनाचा बोध होतो. तो नर्मदा-पठारावर येता येता समूहाने राहू लागला



आदि-मानव काळातील कबर

असावा. कारण या चित्रांतून त्याच्या समूहाला पशूंनी घेरल्याची चित्रे आहेत. त्याने दगड कोरून भाल्यासारखी हत्यारे केली. प्रेतांना तो दगडांत पुरू लागला. पुढे पुढे तो प्रेतांचे दफनही करू लागला. नर्मदा-पठारावर तेव्हा डुक्कर आदी वन्यपशू भरपूर होते. इतके की, अनेक चित्रांतून या पशूंची चित्रे आढळतात. येथे जबलपूर जिल्ह्यात स्तंभासारखी एक वस्तू सापडली आहे. एका तलावामध्ये सापडलेली ही वस्तू आदि-युगातील आहे. यावरून नर्मदा-पठारावर राहणारा आदि-मानव प्रगत होता, काही निर्माण करण्याच्या प्रवृत्तीतला होता, असे अनुमान निघते.

या भूमीचे स्वरूप त्या वेळी आजच्यापेक्षा खूपच वेगळे असावे. मोठीमोठी जंगले व दलदलींनी हा भू-भाग व्यापला

होता. मोठ्या मोठ्या नद्या या आजपेक्षा अधिक प्रचंड, रुंद व खोल होत्या. विशाल नद्या व दाट जंगलांच्या परिसरात भयानक पशूंच्या भीतीने मानवाचे जीवन अधिकच कष्टमय झाले असावे. कंदमुळे व मासे खाऊन चरितार्थ चालवणारा मानव हा शिकारीही होता. एक दिवस अचानक त्याने त्याच्यावर हल्ला करणाऱ्या पशूला दगडाने मारले! आणि एका शस्त्राचा त्याला शोध लागला! हे शस्त्र वापरून तो स्वतःचे संरक्षण व शत्रूचा नाश करू लागला.

नर्मदेच्या पठारावरील दाट झाडेझुडपे, पशुपक्ष्यांची विपुलता ही समृद्धी बघूनच आदि-मानवाने तेथे वास्तव्य केले असेल. त्या वेळी पुरुष टोळ्या बनवून शिकारीला जात व त्यानंतर स्त्रिया जंगलातून फळे, कंदमुळे शोधण्यासाठी बाहेर पडत. खाद्याच्या शोधामुळे तो एका जागी स्थिर राहू शकत नव्हता. काही जागांतून थोडा काळ राहण्यासाठी तो गुहांचा आश्रय घेत होता. शिकारीत मारलेल्या पशूंच्या कातड्याने शरीर झाकून निसर्गापासून तो स्वतःचे संरक्षण करत होता.

हळूहळू याबरोबरच मानवाने औजारे बनवण्याकडे अधिक लक्ष दिले. ही औजारे हळूहळू अधिक सफाईदार व धारदार होऊ लागली. हे शिकारी जीवन पूर्णतः निसर्गावर, बाह्यपरिस्थितीवर अवलंबून होते,— ज्यामध्ये

मानवाचा सर्वात अधिक वेळ भूक व भीती यांपासून स्वत:चे संरक्षण करण्यामध्ये जात होता. कदाचित जंगलांत आपोआप लागलेल्या आगीला– वणव्याला बघून त्याने अग्नीचा उपयोग जाणला असेल, व तोच अग्नी सुरक्षित ठेवून इतरत्र शिजवण्यासाठी त्याने वापरला असेल. नंतर गारगोट्यांच्या उपयोगातून अग्नी निर्माण करण्याची कला त्याला अवगत झाली असेल. त्यामुळे कच्चे मांस व अन्न योग्य वेळी शिजवणे शक्य झाले असेल. तसेच वाचलेले अन्न सुरक्षित ठेवण्यासाठी मातीची भांडी बनवणे त्याने सुरू केले असेल.

रंगीबेरंगी दगडांचे छेद पाडलेले तुकडे बघून या युगात अलंकाराच्या उपयोगाला सुरुवात झाली असे अनुमान निघते. कालान्तराने अधिक उत्कृष्ट उपकरणे, कपडे, घर, नौका आदींच्या निर्मितीस सुरुवात झाली. जीवनावश्यक सोयींच्या वाढीबरोबर मानव लवकर नष्ट होणाऱ्या नाशवंत वस्तूंचा अधिक टिकाऊ स्वरूपाचा उपयोग करणे शिकू लागला. प्रेतसंस्कारादी बाबतींत मिळालेले पुरावे बघता असे अनुमान निघते की, मानव अदृश्य जगत व मृत्यूनंतरची अवस्था यावर विचार करू लागला होता.

गुहेमध्ये राहणाऱ्या आदि-मानवाने आपले जीवनानुभव रेखांच्या माध्यमातून व्यक्त करण्यास सुरुवात केली; परंतु त्याला जनावरांची उलटी-सरळ चित्रे येवढीच

मर्यादा होती. यानंतर आदि-मानवाच्या जीवनात क्रान्ती घडली ती त्याने काही वन्य पशूंना पाळीव बनवले तेव्हा! त्यांच्याकडून तो सामानाची ने-आण करू लागला. हा खूपच महत्त्वाचा शोध होता. कारण जनावरांमागे वणवण फिरणे सोडून तो जनावरांना स्वतःच्या इच्छेनुरूप फिरवू लागला होता!

मध्य अश्मयुगात येता येता छोटया धारदार व सुव्यवस्थित अशा हत्यारांची, औजारांची निर्मिती होऊ लागली. नर्मदा-तीरावर सापडलेल्या अवशेषांत दगडांचे रंगवलेले तुकडे मिळाले. हे पाहून मानव रंगाबाबतही समजू लागला होता असे वाटते. नव-अश्मयुगात शेतीची सुरुवात झाली. फळे वगैरे शोधताना मानवाने झाडे उगवण्याचे रहस्य शोधले. प्रथम प्रथम झाडे ही पशूंना घेरण्यासाठी प्रलोभनासारखी लावली गेली असावीत.

शेतीचा शोध हा मानवाच्या जीवनात अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या शोधामुळे बाह्य परिस्थितीवर अवलंबून राहणे सोडून त्याला काही मर्यादेपर्यंत परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे शक्य होऊ लागले. यामुळे आता त्याला फळे व कंदमुळे आदींच्या शोधात वणवण फिरण्याची आवश्यकता उरली नाही. मानव आता बीज रोवून फळाची वाट पाहू लागला. याचाच अर्थ, आपले भटके जीवन सोडून तो एका जागी राहू लागला. याच युगात दगड


घासण्याची व पॉलिश करण्याची क्रिया सुरू झाली. यामुळे आजवर उपयोगी नसलेल्या दगडांचा, त्यावर प्रक्रिया करून तो उपयोग करू लागला. अवजारे अधिक उपयोगी व धारदार बनू लागली.

या अवजारांचा उपयोग करून चांगली घरे, नौका, शस्त्रे आदींच्या बनावटीस सुरुवात झाली. हल व चाकाचा शोध याच युगात लागला. चाकावरून भांडीही बनवू लागले. घरे बनू लागली व स्थिर अशा गावांच्या निर्मितीस सुरुवात झाली. घरातून राहणाऱ्या मानवाच्या सामुहिक अस्तित्वाच्या खुणा नर्मदा काठावरच सापडतात. या शोधांच्या आधारे घरांची दोन काळांत विभागणी करता येईल.

पहिल्या काळात घरे खोदली गेली. गढीच्या आकाराच्या या घरांना छत नसे. वरच्या बाजूस अरुंद व खाली रुंद असणाऱ्या या घरांना वरून खाली येण्यास जिना असे. लाकडी शिडीचाच जिन्यासारखा उपयोग आदि-मानव करीत असावा. या घरांच्या भिंती मातीने लिपल्या जात व खाली जमीन सपाट असे. कधी कधी छपरासारख्या वस्तूने ही घरे वरून झाकली जात असत.

दुसऱ्या काळातील घरांवर छत असे. त्याचा उपयोग चौकासारखा केला जाई. या सर्व गोष्टींवरून हे सिद्ध होते की, नर्मदाकाठ हे आदि-मानवाचे विहारस्थळ होते.

त्यांच्या संस्कृतीचा जन्म व विकासही येथेच झाला. याच किनाऱ्यावर अनेक संस्कृतींचा उदय आणि अस्तही झाला.





आदि-विश्वाचे अनुमानित रूप

भारतातील आदि मानवाने नर्मदा-तीरावरील पहाडांवर आपल्या खुणा ठेवल्या आहेत. जेव्हा उत्तर भारत पाण्याखाली होता तेव्हा नर्मदेला लागून असलेली दक्षिण व दख्खनची भूमी सुकी सुकी होती. हळूहळू तिच्या किनाऱ्यावर नव्या संस्कृतीचा उदय झाला. नवी संस्कृती फुलली, बहरली, विकास पावली. त्यानंतर अनेक जाती आल्या व गेल्या, परंतु नर्मदेला त्याचे काय ? त्या अनेक प्राचीन संस्कृतींची आठवण अंतरंगात ठेवून ती शांतपणे वाहात आहे.

# नर्मदा : ४

मध्य भारतात विंध्य व सातपुडा पर्वतांची दूरवर पसरलेली रांग आहे. ती उत्तर भारताला दक्षिण भारतापासून अलग करते. उत्तर व दक्षिण यांमध्ये ती भिंतीसारखे काम करते. विंध्य व सातपुडा यांमध्ये अमरकंटक नावाचा मोठा डोंगर आहे. पौर्णिमेच्या शीतल व अमृतमय किरणांनी ही पहाडी नाहून निघते तेव्हा अत्यंत सुंदर दृश्य दिसते. चांदण्या रात्री घनदाट जंगलाने झाकलेली ही पहाडी आगळेच रूप धारण करते. या पहाडाची उंची ३००० फुटांहून अधिक आहे. त्यामुळे ती जणू आकाशाशी हितगुज करीत आहे असे वाटते. येथेच सोहागपूर



'अमरकण्टकचे कोटितीर्थ-कुंड

जिल्हयात अमरकंटक नावाचे गाव आहे. तेथील कुंडातील एका गोमुखातून जलधारा निघते. हिला कोटिकुंड

म्हणतात. हेच नर्मदेचे आरंभीचे रूप आहे. फार पूर्वी येथे पाण्याच्या संतत धारेने तयार झालेला खोल खड्डा होता. नंतर येथे एक छोटे कुंड बनवले गेले, व आजूबाजूस बरीचशी मंदिरे बांधली गेली. येथे दिवसरात्र ये-जा असते, आणि घंटांचे आवाज निनादत असतात.

अमरकंटकला जायचे अनेक मार्ग आहेत. पूर्वी रेल्वेच्या कटनी–बिलास शाखेकडून पेंडरा रोड स्टेशनवर उतरून गोरेला गावापासून अमरकंटकला पोचता येते. तसेच जबलपूर व मंडलाहूनही जाता येते.

कोटितीर्थ-कुंड समुद्रपातळीपासून ६०० फूट उंचावर आहे. येथे राहणाऱ्यांना फार आनंद व समाधान मिळते. इंदोरच्या महाराणी अहिल्याबाईने बांधलेली धर्मशाळा भरपूर प्रशस्त आहे. तिच्या चारी बाजूंस घनदाट जंगल आहे. येथे जनावरांची सतत भीती असते. उंचावर असल्याने उन्हाळ्यात फार शीतल हवामान असते. पण थंडीच्या दिवसांत अत्यंत थंडी असते. गोमुखातून निघून नर्मदा ज्या जलकुंडात पडते तेही फार सुंदर बनवलेले आहे.

नागपूरच्या भोसले वंशातील एका राजाने हे कुंड बनवले आहे. कुंडाच्या भोवती छोटी छोटी मंदिरे बांधलेली आहेत. यात्रेकरूला येथे दर्शनाला आल्यावर अनंत सुखांचा अनुभव येतो.

म्हणतात. हेच नर्मदेचे आरंभीचे रूप आहे. फार पूर्वी येथे पाण्याच्या संतत धारेने तयार झालेला खोल खड्डा होता. नंतर येथे एक छोटे कुंड बनवले गेले, व आजूबाजूस बरीचशी मंदिरे बांधली गेली. येथे दिवसरात्र ये-जा असते, आणि घंटांचे आवाज निनादत असतात.

अमरकंटकला जायचे अनेक मार्ग आहेत. पूर्वी रेल्वेच्या कटनी—बिलास शाखेकडून पेंडरा रोड स्टेशनवर उतरून गोरेला गावापासून अमरकंटकला पोचता येते. तसेच जबलपूर व मंडलाहूनही जाता येते.

कोटितीर्थ-कुंड समुद्रपातळीपासून ६०० फूट उंचावर आहे. येथे राहणाऱ्यांना फार आनंद व समाधान मिळते. इंदोरच्या महाराणी अहिल्याबाईने बांधलेली धर्मशाळा भरपूर प्रशस्त आहे. तिच्या चारी बाजूंस घनदाट जंगल आहे. येथे जनावरांची सतत भीती असते. उंचावर असल्याने उन्हाळ्यात फार शीतल हवामान असते. पण थंडीच्या दिवसांत अत्यंत थंडी असते. गोमुखातून निघून नर्मदा ज्या जलकुंडात पडते तेही फार सुंदर बनवलेले आहे.

नागपूरच्या भोसले वंशातील एका राजाने हे कुंड बनवले आहे. कुंडाच्या भोवती छोटी छोटी मंदिरे बांधलेली आहेत. यात्रेकरूला येथे दर्शनाला आल्यावर अनंत सुखांचा अनुभव येतो.

या अनेक मंदिरांत गौरीशंकर व नर्मदेची देवळे फार प्रसिद्ध आहेत. येथे शिवरात्रीस मोठा मेळा भरतो. सूर्यग्रहणाच्या वेळीही येथे खूप गडबड असते. या वेळी देशाच्या प्रत्येक भागातून प्रवासी येतात. येथील दृश्य अत्यंत रमणीय असे दिसते.

अमरकंटकच्या कोटितीर्थ कुंडावर प्रत्येक वर्षी महाशिवरात्रीच्या वेळेस मोठा मेळा भरतो. या मेळचाला दक्षिण व उत्तरेकडून हजारो भाविक यात्रेकरू येतात. कुंडात स्नान करून शंकराची व नर्मदेची पूजा करतात. असे सांगतात की, या जागेत फार पूर्वी व्यास, भृगू, कपिल आदी ऋषी व स्वतः भगवान शंकर यांनी तप केले होते. या तीर्थक्षेत्राला शंकराचे निवासस्थान मानले आहे. पुराणात नर्मदेचे एक नाव 'रेवा' असे आहे. त्या वेळेस येथील जमीन सुकलेली होती. इकडे शंकर तप करण्यासाठी बसले आणि त्यांना मध्येच तहान लागली; परंतु तेथे पाणी कसे मिळणार? सर्वत्र दुष्काळच होता. स्वर्गात इंद्राने स्वतः या अडचणीचा अनुभव घेतला व नर्मदेला अमरकंटकवर उतरवले. नर्मदा पृथ्वीवर शंकराची सेवा करण्यासाठी आली. संस्कृतमध्ये 'रेवा' याचा अर्थ 'उडी मारणे' असा होतो. ८०० मैल लांबीच्या प्रवासात ५००० फूट खाली उतरण्यासाठी नर्मदेला अनेकदा उड्या माराव्या लागल्या.

परंतु या नदीचे नर्मदा हे नाव कसे पडले ? विचार केल्यावर स्पष्ट होते की, अत्यंत योग्य असे नाव नदीस दिले गेले आहे. 'नर्मदा' याचा एक अर्थ आहे क्रीडा वा खेळ ! लहान-मोठे सर्व नर्मदेच्या जलात आनंदाने क्रीडा करू शकतात, म्हणून हिला नर्मदा म्हटले तर सार्थच होईल. नर्मदा याचा दुसरा अर्थ आहे आनंद आणि सुख देणारी नदी. नर्मदा खरोखर सुखदायिनी आहे, हे सत्य आहे.

उत्तर प्रदेशातील हिरवळीच्या सुपीक जमिनीपासून पुढे राजस्थानचा वालुकामय दुष्काळी प्रदेश लागतो. बारा महिने पाण्याचा अभाव व भयंकर उष्णता अशा या प्रदेशावरून आलेला प्रवासी जेव्हा दक्षिणेला पुढे जातो आणि विंध्य पर्वत ओलांडून नर्मदेचे दर्शन घेतो, तेव्हा त्याचे सर्व कष्ट दूर होतात. नर्मदेच्या दर्शनाने त्याचे मन तृप्त होते, शांत होते.

दक्षिण भागातील यात्रिक डोंगराळ भागातील अडचणी पार करून सातपुडा वगैरे दुर्गम पर्वत ओलांडतो व नर्मदेच्या तीरावर पोचतो तेव्हा त्याला अपार आनंद होतो. येथे फार उन्हाळाही नसतो व फार थंडीही नसते. त्यामुळे या किनाऱ्याकिनाऱ्याने यात्रा करण्यासाठी नेहमी अनुकूल हवामान असते. असे हवामान सतत वर्षभर कुठल्याही नदीकिनाऱ्यावर आढळत नाही. यासाठीच नर्मदेला सदाबहार असणारी नदी म्हणतात.

नर्मदा अमरकंटक तीर्थामध्ये प्रकट होते. अमरकंटक-पासून निघून नर्मदा विंध्य आणि सातपुड्याच्या मधून वाहात भडोचजवळ खंबायतच्या खाडीत अरबी समुद्राला मिळते. अमरकंटकपासून नर्मदेला भडोचपर्यंत जाताना ८०० मैलांचा प्रवास करावा लागतो. परिक्रमा करणाऱ्या यात्रिकांना दोन्ही बाजूंचा मिळून १७०० मैलांचा प्रवास करावा लागतो. या संपूर्ण यात्रेमध्ये ४०० लहानमोठी गावे दोन्ही काठांवर वसलेली दिसतात. दुसऱ्या कुठल्याही समुद्रकिनाऱ्यावर येवढी गावे आढळत नाहीत.


कोटितीर्थ-कुंडात आल्यावर नर्मदा जादूच्या कांडी-प्रमाणे गुप्त होते. तिचे अस्तित्वही दिसत नाही. पण भूगर्भशास्त्रज्ञांनी शोध लावला आहे की नर्मदा १० मैल-पर्यंत जमिनीखालूनच प्रवास करते ! त्यानंतर शंखतीर्था-मध्ये ती प्रकट होते. कोणी लोक म्हणतात की, नर्मदा ही सरस्वती नदीचीच एक धारा आहे, व गंगा नदीपासून अलग होऊन ती शेकडो मैल जमिनीच्या खालून वाहते व पुन्हा कोटितीर्थामध्ये प्रकट होते. अनेक वैज्ञानिकांनी नर्मदा व सरस्वतीच्या पाण्यांची तपासणी केली आहे. या तपासणीमध्ये असे सिद्ध झाले आहे की, दोन्ही जलांत समान गुण आहेत, व निश्चितच अतिप्राचीन सरस्वतीची एक धारा आत आत भरकटत वाहात नर्मदेच्या धारांमध्ये मिसळली आहे.

अमरकंटकपासून नर्मदेची पवित्र यात्रा सुरू होते. उंचावरून उतरत असल्याने प्रवाहाला खूप वेग असतो. उसळत-घुसळत, एखाद्या पहाडी युवतीप्रमाणे तेजाने तळपत ती मार्गक्रमण करीत जाते. या प्रवासात ती अनेक जंगले व डोंगरदऱ्या पार करते. अत्यंत दुर्गम मार्ग असल्याने यात्रिकास थकवा येत असला तरी रमणीय निसर्ग-सौंदर्याच्या रसग्रहणाने यात्रिक देहभानच विसरतो! मनाला थकवा न जाणवता उलट उत्साहच वाढतो! नदीवरून येणाऱ्या गार वाऱ्याने मनाला ताजेतवाने वाटते. कमीत कमी १२ छोटेमोठे झरे आपले स्नेहमय अंतःकरण घेऊन नर्मदेस भेटावयास येतात. नर्मदेचा आनंद व उत्साह त्यांच्या भेटीने द्विगुणित होतो व ती अधिक उत्साहाने वाहते. नर्मदा घाटाचा हा प्रदेश काळ्या मातीचा बनलेला आहे व तो अत्यंत सुपीक असल्याने कापसाच्या उत्पादना-साठी प्रसिद्ध आहे.

यात्रेच्या आरंभी पहिले महत्त्वाचे स्थान येते मंडला. ते नर्मदेपासून २०० मैल दूर नर्मदेच्या उत्तर तटावर वसले आहे. येथे नर्मदेची व आजूबाजूची शोभा अनुपमेय अशी दिसते. येथे आल्यावर परत जाण्याचे भानच राहात नाही. निसर्गाचे हे देखणे रूप बघतच राहावेसे वाटते. तीरावर बांधलेले सुंदर घाट त्यांवरील सुंदर मंदिरे, व कोवळ्या उन्हात चमकणारे मंदिरांचे कळस फारच सुंदर दिसतात.

नर्मदाकिनारी एक पुरातन डोंगरी किल्ला आहे. मंडलाचा राजा नरेन्द्रशहाने १८८७ च्या आसपास हा बांधला, व मंडला ही राजधानी बनवली. किल्ला आता मोडकळीस आलेला आहे. तेथे वेडेवाकडे गवत वाढलेले आहे. किल्ला बघून आजही सहज अंदाज बांधता येतो की, पूर्वी संरक्षणाच्या दृष्टीने तो खूपच मजबूत व भरभक्कम असावा. किल्ल्यामध्ये राजेश्वरीचे मंदिर आहे. त्यामध्ये इतर देवतांबरोबर सहस्रार्जुनाची मूर्तीही आहे.

काही लोकांचे म्हणणे आहे की, या मंडला गावाचेच नाव पूर्वी महिष्मती होते; व येथेच पूर्वी मंडनमिश्र व शंकराचार्यांचा वाद झाला होता. परंतु जितकी तोंडे तितक्या गोष्टी ! खरे काय आहे ते कोणालाच सांगता येणार नाही. मंडलाचेच पूर्वीचे नाव महिष्मती आहे, परंतु शंकराचार्यांच्या घटनेचा व त्याचा काही संबंध नाही. ते काहीही असो, महिष्मतीचे स्वतःचे असे वैशिष्टय आहे हे मान्य केले पाहिजे. तेथील अहिल्येश्वराचे देऊळ फार सुंदर आहे. येथे जवळपास खूप लहानमोठे डोंगर आहेत. त्यामुळे नर्मदेच्या प्रवाहाचे शेकडो छोटया प्रवाहांत रूपांतर झाले आहे. असे म्हणतात की, राजा सहस्रबाहूने नर्मदेचा प्रवाह अडवण्याचा प्रयत्न केला होता. या सहस्रधारांचे दृश्य फार सुंदर दिसते.



महिष्मतीचे अहिलेश्वर मंदिर

मंडलाच्या पुढे प्रवाह काहीसा शांत होतो. प्रवाहाचा शांतपणा पाहून वाटले, पहाडातील खळखळाटाने नर्मदा-मैय्या दमून गेली आहे, व त्यामुळे तिची पावले मंद पडत आहेत ! येथील दोन्ही तटांवरचे दृश्य रमणीय आहे. दूर दूर डोंगर आहेत, मध्यावर विस्तृत मैदान आहे. नर्मदेच्या दोन्ही काठांवर असलेल्या हिरव्यागार शेतांनी तिला हिरवागार शालू बहाल केल्यामुळे नर्मदामैय्याचे रूप अधिकच सुंदर भासू लागते.

येथे भेडाघाट नावाचे ठिकाण आहे. हे सुंदर ठिकाण जबलपूरपासून तेरा मैलांवर असल्याने तेथे पक्की सडक आहे. तसेच जबलपुरहून इटारसीला जाणाऱ्या रेल्वे लाइन-वर भेडाघाट नावाचे स्टेशनही आहे. तेथून भेडाघाट तीन मैलांवर आहे. कोणे एके काळी भृगु ऋषीने येथे घोर तप

केले होते. त्याच्या तपश्चर्येने इंद्राचे आसन डळमळू लागले ! येथेच प्रसन्न होऊन ब्रह्मदेवाने भृगूची मनो-कामना पूर्ण केली.


उत्तरेच्या बाजूने वामनगंगा नावाची छोटी नदी



भेडा घाट

विंध्याद्रीवर जन्म घेऊन २६० मैल प्रवास करून भेडा गावाजवळ प्रेमाने नर्मदेला येऊन भेटते. या संगमामुळे या जागेला ‘ भेडाघाट ’ म्हणतात. येथील संगमरवरी पहाड

अद्वितीय आहेत. सूर्याची किरणे जेव्हा या पहाडावर पडतात तेव्हा वाटते की, चांदीचे मोठमोठे तुकडे कोणा शिल्पकाराने आडवे-तिडवे कापून ठेवले आहेत ! संगम-रवरी अशा चमकणाऱ्या या पहाडांवरून नर्मदेचे हिरवे पाणी खालच्या खड्ड्यात पडते, तेथे निसर्गाच्या [illegible]ची कमाल दिसते. शतकांपासून निसर्गाचे पुजारी [illegible]च्या सौंदर्याला बघण्यासाठी येतात. या मुक्त सौंदर्याचा आस्वाद घेताना त्याची मती गुंग होते.



'धुआँधार' धबधबा

या पहाडामधून खळाळत वाहाणाऱ्या नदीला बघून वाटते, विधात्याने जणू चंद्रच वितळवून टाकला आहे व

हेच ते चंद्रजल आहे ! या क्षेत्रात नर्मदेवर अनेक धबधबे आहेत. या सर्वांत 'धुआँधार' नावाचा धबधबा प्रसिद्ध आहे. तेथे चाळीस फुटांवरून नर्मदा खाली कोसळते. धुआँधार म्हणजे धुराची धार वा धुराचा धबधबा ! पहाडावरून आदळून खाली कोसळणाऱ्या जलकणांचे तुषार दुरून धुक्यासारखे दिसतात. ते बघून धुराचाही भास होतो. म्हणूनच हे नाव त्याला पडले आहे.

या शुभ्र संगमरवरी पहाडातील कंगोऱ्यांतून वाहणारी नर्मदेची दुग्धधवल धारा पौर्णिमेच्या चांदरात्री अत्यंत सुंदर दिसते.

धुराच्या धबधब्यानंतर दोन मैलपर्यंत नर्मदेचा प्रवाह सफेत संगमरवरी पहाडांतून जातो. येथे दोन्ही काठांच्या जागी शंभर फुटांहून अधिक उंचीच्या संगमरवरी भिंती उभ्या आहेत आणि नर्मदा एखाद्या सम्राज्ञीच्या थाटात तेथून पुढे जाते. पौर्णिमेच्या रात्री हे दृश्य फार सुंदर दिसते. या रात्री येथे सतत वर्दळ चालू असते. एका ठिकाणी हे दोन पहाड इतके जवळ आले आहेत की माकड एका उडीत इकडून तिकडे जाईल ! म्हणूनच या जागेस 'माकडाची उडी' म्हणतात. आमच्या देशातील अनेक सुंदर दृश्यांपैकी हे एक देखणे दृश्य आहे. या पहाडावर उभे राहून दूरवर पसरलेला व हिरव्या शेतांनी फुललेला मैदानी भाग दिसतो. या मैदानी भागात मध्येच उभे असलेले दगडांचे ढीग बुद्धिबळाच्या सोंगट्यांप्रमाणे दिसतात !

भेडाघाट क्षेत्राच्या जवळपासच अनेक बघण्यासारखी ठिकाणे आहेत. यांमध्ये सर्वांत प्रेक्षणीय असे शंकराचे मंदिर आहे. हे मंदिर एका छोटचा पहाडावर आहे. या मंदिरास 'चौसष्ट योगिनींचे मंदिर' असेही म्हणतात; कारण मंदिराच्या चारी बाजूंस चौसष्ट योगिनींची चित्रे काढली आहेत. या मूर्तींतील शिल्पकला अजोड आहे. मंदिरात शंकर-पार्वतीची भव्य मूर्ती आहे. ज्या पहाडावर हे मंदिर आहे त्याच्या दोन्ही बाजूंनी नर्मदा नदी वाहते. जणू काही शिवालयाला प्रदक्षिणा करण्याची तिची इच्छा असावी ! या पहाडावरील शिवमंदिराची भव्यता दुरूनही नजरेत भरते. त्रिपुरीचा राजा गायकर्ण देव ह्याची पट्टराणी अहल्यादेवीने सन ११५५–५६ मध्ये हे मंदिर बांधले. आठशे वर्षांच्या जुन्या अशा या मंदिरावर काळाने खूप आघात केले आहेत ! मंदिराच्या बाजूच्या सर्व मूर्ती जवळ जवळ फुटल्या आहेत परंतु तरीही मंदिराची भव्यता नजरेत भरते.

या पुढील यात्रा अजूनही रमणीय आहे. भेडाघाट-नंतर ब्राह्मणघाट येतो. हादेखील भेडाघाटप्रमाणे रमणीय आहे, मनोरम आहे. येथील शांत वातावरणात मनाला अपूर्व शांती देतो. येथेही आकारात व शिल्पात साम्य असणारी अशी खूप मंदिरे आहेत.

येथून थोडे पुढे गेल्यावर नर्मदा दोन धारांत विभागली जाते. त्यामुळे मध्ये छोटे द्वीप बनले आहे. हे द्वीप घनदाट

जंगलाने झाकले गेले आहे. येथे अनेक प्रकारचे वृक्ष आहेत. येथील सौंदर्यही पाहण्यासारखे आहे. यापुढे गेल्यावर नर्मदा एका छोटयाशा पहाडावरून उडी मारून पुन्हा अनेक धारांनी वाहू लागते. यासाठी या जागेला 'सप्तधारा' असे म्हणतात. उंचावरून वेगाने खाली पडणाऱ्या प्रवाहाने या धारांखाली मोठी व खोल कुंडे तयार झाली आहेत. या कुंडांना भीम, अर्जुन, ब्रह्मदेव आदींची नावे दिली आहेत. ब्रह्मदेवाने येथे एकदा यज्ञ केला होता असे म्हणतात. येथून पुढे जवळ जवळ ७ मैल नर्मदा फार धिम्या गतीने वाहते. यामुळे हा मैदानी भाग एकदम समतोल आहे. याच मैदानात नर्मदेच्या दक्षिण तटावर राणी दुर्गावतीने बांधलेला विशाल घाट व एक शिवमंदिर आहे. मंदिराची बाजू व आतील शिवाची मूर्ती दोन्ही भग्नावस्थेत आहेत. या मंदिराजवळ अजून एक मंदिर आहे. त्यामध्ये दोन दातांवर पृथ्वी धारण करणाऱ्या वराहरूप भगवन्ताची मोठी मूर्ती आहे. नर्मदेच्या काठी सांडिया नावाचे गाव आहे. या जागी शांडिल्य ऋषींनी आपल्या पत्नीबरोबर तप केले होते.

अनेक मोठे मोठे यज्ञ येथे झाले. या क्षेत्रात अनेक जागी सुगंधित भस्माचे ढीग सापडतात;—ज्यांचा उल्लेख पुराणात मिळतो. सांडिया गावाच्या ५ मैल पुढे दक्षिण-तटावर माछा गावाजवळ कुब्जा नदी आतुरतेने नर्मदेला येऊन मिळते.

कुब्जा नदीचा जन्म सातपुडा पहाडावर होतो. १५७ मैलांचा प्रवास वेगाने करून ती नर्मदेला येऊन मिळते. या दोन्ही मैत्रिणी एकमेकींना भेटून गत गोष्टी एकमेकींस सांगत, ऐकत पुढे प्रवास सुरू करतात. या नद्यांच्या संगमाला रामघाट' म्हणतात. रामघाटाला 'बिल्वाम्रक तीर्थ' असेही म्हणतात. प्राचीन काळी राजा रतीदेवाने येथे महान बिल्वयज्ञ सुरू केला होता. या यज्ञाला अनेक राजे, ऋषी आले होते. हा यज्ञ सतत एक महिना चालू होता. यज्ञाच्या समाप्तीनंतर यातून एक मोठी ज्योत निर्माण झाली. तेव्हापासून या यज्ञाचे नाव सर्वांच्या तोंडी झाले. हळूहळू त्याचे तीर्थक्षेत्र बनले.

यापुढे नर्मदातटावर एक तीर्थ आहे. त्याचे नाव सूर्यकुंड तीर्थ आहे. असे सांगतात की, येथेच भगवान सूर्यनारायणाने राक्षस अंधकासुराचा वध केला. या तीर्थाच्या पुढे नर्मदेला तवा येथे तिची मुख्य उपनदी येऊन मिळते. हा संगम प्रयागच्या त्रिवेणी संगमाप्रमाणे प्रसिद्ध आहे. येथे राजा वैश्वानर याने घोर तप केले. येथील हवा फार सुंदर आहे. यात्रिक येथे विश्रांती घेऊन शीण घालवतात. राहाण्यासाठी येथे धर्मशाळा आहेत. हे एक शांत, एकटे, विजन स्थान आहे.

बांदराभावच्या ६ मैल पुढे नर्मदा नदीच्या दक्षिण तटाला होशंगाबाद नावाचे सुंदर नगर आहे. माळव्याच्या प्रसिद्ध

होशंगशहाने ते उभारले. होशंगशाहचे नाव माळव्याच्या इतर सुलतानांच्या नामावळीत फार आदराने घेतले जाते. प्रजा त्याच्यावर खूप प्रेम करी. त्याने हिंदू व मुसलमानांना समान वागणूक दिली. जामा मशीद व मांडवचा प्रचंड किल्ला त्याने त्याच्या कारकीर्दीत बांधला. ही दोन्ही प्रेक्षणीय ठिकाणे आहेत.

होशंगाबाद वसवण्यापूर्वी तेथे नर्मदापूर नावाचे गाव होते. येथे नर्मदेला सुंदर व पक्के घाट होते. येथे जवळच फार पूर्वी बांधलेले नर्मदामैय्येचे मंदिर आहे. येथे दर वर्षी मोठा मेळा भरतो. येथे एक मोठी धर्मशाळाही आहे.

यानंतर मेलघाट हांडिया आणि नेमावर जवळ येते. मेलाघाट जामनेर नदीच्या संगमावर आहे. येथे आत्माराम बाबा नावाच्या साधु-पुरुषाची समाधी आहे. त्याच्या पुण्यतिथीच्या वेळी दर वर्षी येथे मेळा भरतो.

नेमावर येथे सिद्धेश्वर महादेवाचे सुंदर व प्राचीन मंदिर आहे. हे मंदिर म्हणजे शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. नेमावर हे नर्मदा यात्रेतले मध्यावरचे ठिकाण आहे. यावरून यास ‘ नाभिस्थान ’ म्हणतात. येथून भडोच व अमरकंटक हे सारख्याच अंतरावर आहेत. नेमावरच्या पुढे धायडी नावाचे एक स्थान आहे. हे स्थान नेमावर व ओंकारेश्वर यांच्या मध्ये आहे. येथे नर्मदा एका खोल कुंडात प्रवेश करते. ‘ धायडी कुंड ’ हा नर्मदा नदीचा सर्वांत

मोठा धबधबा आहे. ६० फूट उंचीवरून नर्मदेचे पाणी कुंडात पडते. जलौघाबरोबर कुंडात छोटेमोठे दगडही पडतात. तेच दगड घासून गुळगुळीत व चमकदार अशी शिवलिंगे बनवली जातात. भारतात जेवढी शिवमंदिरे नवीन बनतात त्यांसाठी शिवलिंगे येथेच बनवली जातात. मध्य रेल्वेच्या बीड स्टेशनपासून धायडी कुंड हे स्थान २० मैलांवर आहे. येथे पुनासाची जलविद्युत योजनेतील धरण हे तवा नदी-वरच बांधले जात आहे.

आता आपण नर्मदेवरील ओंकारेश्वर नावाच्या स्थानाजवळ पोहोचू. हे रेवा तीरावरील सर्वांत महत्त्वाचे तीर्थस्थळ आहे. पश्चिम रेल्वेच्या छोट्या लाइनवर इंदोर व खांडव्याच्या मध्ये ओंकारेश्वर नावाचे स्टेशन ७ मैलांवर आहे. इंदोर, खांडवा, ओंकारेश्वररोडवरून रोज मोटरी जातात. ही एक पक्की सडक आहे.

ओंकारेश्वर एक प्राचीन तीर्थ आहे. तेथे नर्मदेच्या मध्ये एक उंच पहाडी आहे—जिच्या दोन्ही बाजूंनी नर्मदेचा प्रवाह वाहतो. टेकडीच्या दक्षिणेस ओंकारेश्वराचे मंदिर आहे. दक्षिणेकडील प्रवाहाच्या दोन्ही बाजूंस वस्ती आहे. दक्षिण वस्तीचे नाव शिवपुरी व उत्तर वस्तीचे विष्णुपुरी आहे. येथेच शिवाच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योति-र्लिंग आहे. नर्मदेच्या दक्षिण तटाला अमरेश्वराचे भव्य मंदिर आहे. या प्राचीन मंदिराखालून एक धारा उगम

पावून नर्मदेला मिळते. याला कपिलधारा संगम म्हणतात. कपिलधारेच्या पूर्वेकडे थोडी वस्ती आहे. तिचे नाव ब्रह्मपुरी आहे.

नर्मदेच्या किनाऱ्या किनाऱ्याने पुढे गेल्यावर चक्रतीर्थ नावाचे सुंदर व पवित्र स्थान आहे. विष्णुपुरीच्या पश्चिमेला थोडे दूर मार्कंडेय शीला नावाची टेकडी आहे. श्रद्धाळू यात्रिक येथे येऊन निजतात. त्यांना वाटते, असे केल्याने यमपुरीच्या यातनांतून आपणाला मुक्ती मिळेल. याजवळच पहाडावर मार्कंडेय ऋषीचे मंदिर आहे, आणि नामानंद चैतन्यांचा आश्रम आहे, विष्णुपुरी ते शिवपुरी-पर्यंत नर्मदेतून नौका वाहतूक चालते. शिवपुरीनजीक एका पक्क्या घाटाजवळ नाव जाऊन लागते. या जागेस चक्रतीर्थ म्हणतात. येथे भक्तांची सतत वर्दळ असते. या घाटावरील पहाडावर ओंकारेश्वराचे मंदिर आहे. या प्रदेशाला 'मान्धाता' असे नाव आहे. मान्धाता तीर्थाचा महिमा फार मोठा आहे. अनेक ऋषि-मुनींनी या तीर्थाच्या महिम्याचे वर्णन केले आहे. तीर्थाला ओंकारेश्वर व प्रदेशाला मान्धाता असे म्हणतात. त्याची एक कहाणी आहे.

फार पूर्वी, म्हणजे प्रभू रामचंद्राच्या जन्माच्या आधीची गोष्ट आहे. इक्ष्वाकु वंशामध्ये फार प्रतापी राजे घेऊन गेले. त्याचे नाव मान्धाता होते. त्यांनी येथे भगवान शंकराची

कठोर तपश्चर्या केली. त्यांच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन शंकर प्रगट झाले आणि प्रसन्नतेने वर मागण्यास सांगितले. मान्धाता म्हणाले,


'भगवन्, मला मुक्ती द्या. आणि दुसरं म्हणजे, आपण भक्तांच्या कल्याणासाठी सतत इथंच निवास करा.'

महादेवाने दोन्ही गोष्टींस मान्यता दिली आणि तेव्हापासूनच ओंकारेश्वराची येथें स्थापना झाली. आजही येथे एक चमत्कार दिसतो. तो म्हणजे, या पहाडांचा आकार ओंकाराप्रमाणे आहे; त्यामुळे या तीर्थाचे तेच नाव पडले. मान्धाताच्या तपाने या टापूला 'मान्धाता' म्हटले जाते. हा प्रदेश निमाड जिल्ह्यात आहे.

ओंकारेश्वराच्या पहाडावर अनेक पवित्र स्थाने व मंदिरे आहेत. ही पहाडी अत्यंत रमणीय आहे. त्यावर विशाल मैदान आहे. तेथून आसपासचा दूरवरचा प्रदेश दिसतो.

प्राचीन काळी येथे सुधारलेली मानवी वस्ती होती. तिच्या चारी बाजूंस भिंत असे. या भिंतीचे व दरवाजाचे अवशेष आजही दिसतात. आतल्या दरवाजाजवळ अष्टभुजेचे मंदिर आहे. तसेच दुसऱ्या स्थानावर फार सुंदर व मोठ्या मूर्ती उभ्या दिसतात. मैदानाच्या पूर्वेकडील बाजूस एक फार मोठे मंदिर होते. याच मंदिराला सिद्धनाथाचे मंदिर म्हणत. या मंदिराचे छत, गाभारा, ओटा,

खांब– असा काही भाग आजही दिसतो. मंदिराचे छत जवळजवळ १५ फूट उंचीचे असून ओटचाची उची जवळ-



सिद्धनाथाचे प्राचीन मन्दिर

जवळ १० फूट आहे. ओटयाच्या चारी बाजूंस ५।५ फूट उंचीची हत्तीची रांग खोदली आहे. हे सर्व भूतकालीन वैभवाचे अवशेष बघून या मंदिराच्या व बाजूच्या वस्तीच्या वैभवाची कल्पना येते. या मंदिरापासून काही अंतरावर दुसरी एक धारा,–जिचे नाव कावेरी आहे, तिच्या उत्तर तटावर प्रसिद्ध जैन तीर्थ सिद्धवरकूट आहे.

ओंकारेश्वर व अमरेश्वराचे हे पुण्यधाम अनेक ऋषी-मुनींचे पवित्र क्षेत्र म्हणून ओळखले जाते. या टापूच्या आसपास कोठेही जा. अनेक महापुरुषांच्या नावाने ओळ-

खली जाणारी अनेक स्थाने आसपास सापडतील. शंकराचार्य, त्यांचे गुरू गोविंदपादाचार्य, आणि त्यांचे गुरू गौडपादाचार्यही येथेच राहात होते. त्यांच्या नंतरही सिद्ध-तपस्वीजनांनी या स्थानाला आश्रय दिला आहे.

ओंकारेश्वर येथे वर्षातून दोन मेळे भरतात. कार्तिक पौर्णिमेचा मेळा खास मोठा असतो. ओंकारेश्वराच्या आसपास दोन्ही तीरांवर घनदाट अरण्ये आहेत याला 'सीतावन' म्हणतात. सीतावनात दिवसाही वाघ–चित्त्यां-सारखे हिंस्र पशू फिरतात. त्यांच्या डरकाळ्यांचा आवाज दूरवर ऐकू जातो. वाल्मिकी ऋषींचा आश्रम याच जंगलात होता असे म्हणतात.

ओंकारेश्वरापासून नर्मदेचा प्रवाह अत्यंत मंद गतीने वाहतो. असे वाटते की, पाणी शांत होऊन देवाच्या उपासनेत मग्न झाले आहे !

थोडे पुढे गेल्यावर नर्मदेच्या तटावर रावेरखेडे नावाचे गाव वसवले आहे. येथे नदीचे पात्र इतके उथळ आहे की माणूस पायाने ते पार करू शकतो. पूर्वीच्या काळी फौजा येथूनच नर्मदा नदी पार करीत असत. पेशव्यांची सेना येथूनच नर्मदापार होत असे. बाजीराव बल्लाळ या अत्यंत शूर पेशव्याचा उत्तरेची यात्रा करताना येथे नर्मदा-तटी १० एप्रिल १७४७ रोजी मृत्यू झाला. याच रावेर खेड्यात त्या शूर पेशव्याची समाधी आहे.

याच्या शेजारी ससाबरड नावाचे गाव आहे. येथे रेणुका-मातेचे मंदिर आहे. अशी दंतकथा आहे की, परशुरामाने आपला पिता जमदग्नी ऋषी याच्या आज्ञेवरून आपल्या मातेचे शिर कापले होते. नंतर परशुरामाच्या पित्याने तिला पुन्हा जिवंत केले होते.

यानंतर महेश्वरापूर्वी नर्मदेच्या उत्तर तटावर मंडलेश्वर आहे; अनेक विद्वानांचे मत आहे की, मंडनमिश्राचे मूळ स्थान हेच आहे व महेश्वर म्हणजेच पूर्वीचे महिष्मती होय.

मंडलेश्वरापासून महेश्वर ५ मैलांवर आहे. महिष्मती कदाचित येथपर्यंत पूर्वी पसरले असावे. भगवान शंकराचार्य आपल्या दिग्विजयी यात्रेत ज्या रस्त्याने आले त्याचे वर्णन 'शाङ्कर दिग्विजय'मध्ये आहे. हे वर्णन महेश्वर व मंडलेश्वर, आणि आजूबाजूच्या प्रदेशाच्या वर्णनाशी मिळते-जुळते आहे.

मंडलेश्वर येथे एक पुरातन मंदिर आहे. त्यामध्ये मंडनमिश्र, भारती व शंकराचार्य यांच्या मूर्ती आहेत. परंतु त्यांची नावे दुसरी आहेत.

भारतीचे नाव सरस्वती असून, ज्याला शंकराचार्यांची मूर्ती समजली जाते त्याला कार्तिकेयस्वामी म्हटले जाते. परंतु हे दोन्ही— म्हणजे कार्तिकेय व सरस्वती, शंकराच्या मंदिरात कधीच एकत्र नसतात. अशी प्रथाच अस्तित्वात

नाही. त्यामुळे वास्तविक हे मंडनमिश्राचेच स्थान आहे असे वाटते. मंदिराचे वर्णनही शाङ्करदिग्विजय ग्रंथातील वर्णनाशी मिळतेजुळते आहे.

कालिदासाच्या 'रघुवंश'मध्ये इंदुमतीच्या स्वयवरासाठी आलेल्या अनेक राजांच्या वर्णनांत अनुप देशाच्या राजाचे, महिष्मती नगरीच्या राजाचे वर्णन आढळते.

"प्रासाद जालैर्जलवेणु रम्याम्
रेवांमदि प्रेक्षतु मस्तिकाम:
अनूप देशस्य गुणैरनूनम्"

रघुवंशात इन्दुमतीची सखी सुनंदा म्हणते,

'आपल्या महालाच्या खिडकीमध्ये बसून रेवा नदीच्या दर्शनाचा आनंद लुटायचा असेल तर अनूप देशाच्या सर्वगुणसंपन्न अशा नरेशाला तू वरमाला घाल.'

अशी अनेक उदाहरणे जुन्या संस्कृत ग्रंथांत विखुरलेली आहेत. माहेश्वर येथे प्रसिद्ध विद्वान मंडनमिश्र राहात होते. त्यांची कथा फारच थोड्यांना माहीत असेल

एकदा शंकराचार्य वेदान्ताचा प्रसार करीत नर्मदाकिनारी महिष्मतीला पोहोचले. ते मंडनमिश्रास भेटण्यासाठी गेले. मंडनमिश्र हे वेदान्तविरोधकांत अग्रगण्य होते. त्यांना शंकराचार्यांना आपल्या बाजूने करून घ्यावयाचे होते. कुमारिलभट्टाने शंकराचार्यांना आपले शिष्य मंडन-

मिश्राला भेटण्यास पाठवले. मंडनमिश्राच्या बायकोचे नाव भारती होते. तीसुद्धा आपल्या पतीप्रमाणे विद्वान होती. साऱ्या भारतात त्यांची कीर्ती पसरली होती. या नगरीतील सर्व लोक विद्वान आहेत, अशा कथा पसरल्या होत्या. मंडनमिश्रांच्या दारी,पिंजऱ्यातला पक्षीही वेदान्तावर चर्चा करू शकतो, अशी वदंता होती.

शंकराचार्य या नगरीत पोहोचले तेव्हा नदीतटावर स्त्रिया आंघोळ करत होत्या. शंकराचार्यांनी त्यांना मंडनमिश्राचा पत्ता विचारला. त्या स्त्रियांत मंडनमिश्राची दासी गौरी होती. तिने सांगितले, " ज्या घराच्या दरवाजावर टांगलेल्या पिंजऱ्यातील पोपट आणि मैना 'कर्म आपल्याला फळ देतं, की भगवान कर्माचं फळ देतो ? जगाचा नाश होणार आहे, की ते अविनाशी आहे ?' असं काही बोलत असतील तेच मंडनमिश्राचं घर आहे, असं समजा." दासी गौरीने सांगितल्याप्रमाणे शोध घेत शंकराचार्य मंडनमिश्राच्या घरी पोहोचले. परिचयानंतर मंडनमिश्रांना त्यांनी आपला मनोदय सांगितला. मंडनमिश्र वादविवाद कुशल होते. ते एकदम तयार झाले. आता प्रश्न निर्माण झाला, हार-जीतचा निर्णय कोण देणार ? शेवटी मंडनमिश्राच्या विदुषी पत्नीवर— भारतीवर हे काम सोपवले गेले.

दुसऱ्या दिवशी चर्चा सुरू झाली. या दोन तेजस्वी पंडितांची चर्चा ऐकण्यासाठी नगरातील विद्वान जमले.



शंकराचार्य व मंडनमिश्र यांचा वादविवाद

दोघे पंडित शांतपणे आसनस्थ झाले. दोघांच्याही मुखांवर विद्वत्तेचे तेज होते. दोघेही घाबरले नव्हते वा आकाशाकडे साशंकतेने बघत नव्हते. मंदमंद हास्य करत दोघेही सवालाला जबाब देत होते. निर्णय देण्यासाठी दोघांमध्ये भारती बसली होती. 'ब्रह्म व जीव एक आहे' हा शंकराचार्यांचा अद्वैत सिद्धान्त होता,– आणि 'जीव व ब्रह्म यांची

बरोबरी होऊ शकत नाही, ते दोन्ही अगदी भिन्न आहेत.' असे मंडनमिश्रांचे मत होते.

अशा प्रकारे अनेक दिवस चर्चेमध्ये गेले. रोज दोघेही नवीन तर्क व मुद्दे मांडत व चर्चा करत होते. एक दिवस मंडनमिश्र शंकराचार्यांच्या प्रश्नाला उत्तर देऊ शकले नाहीत. ते निरुत्तर झालेले पाहून भारतीने सांगितले, 'माझे पती हरले आहेत.' पतीची हार बघूनही भारती सत्यापासून ढळली नाही. शंकराचार्यांनी सांगितले होते, 'मी हरलो तर संन्यासव्रत सोडून देईन' व मंडनमिश्राने सांगितले होते, 'मी हरलो तर संन्यासधर्माचा स्वीकार करीन.'

मंडनमिश्राला संन्यासी व्हावे लागले, परंतु त्यापूर्वी भारतीने म्हटले, 'माझे पती हरले, मी हरले नाही. आपली जीत अपुरी आहे. मला हारवल्यानंतरच आपण पूर्ण जिंकाल व तेव्हाच माझे पती आपले शिष्य बनतील.'

शंकराचार्य अडखळले व पुरुष स्त्रीशी वाद करू शकत नाही, असे म्हणू लागले. परंतु भारतीसारखी असाधारण स्त्री थोडीच ते मान्य करील? अखेर शंकराचार्यांना तिच्याशी वादविवाद करावा लागला अन् शेवटी भारतीची हार झाली. मंडनमिश्र शंकराचार्यांचा शिष्य झाला व सुरेश्वर नावाने प्रसिद्धीस आला. आता सारा उत्तर भारत शंकराचार्यांच्या प्रभावाखाली आला.

ही झाली पुरातन काळातील गोष्ट. पण आधुनिक काळातही माहेश्वरला स्वतःचे असे स्थान आहे. महाराणी अहिल्याबाईचे नाव साध्वी, दयाळू, न्यायप्रिय राणी म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. नर्मदामातेची ही लाडकी कन्या ! माहेश्वर तिच्या राजधानीचे नाव. येथील किल्ला, मंदिर, महाल, अहिल्येची छत्री व घाट हे सर्व प्रेक्षणीय आहे. हा घाट बघून तर काशीची आठवण येते ! अजूनही हे वस्त्र कलेचे केंद्र आहे. माहेश्वरी साडी तर आजही प्रसिद्ध आहे.

१९४८ साली महात्मा गांधींच्या पवित्र अस्थी भारताच्या प्राचीन, पवित्र नद्यात विसर्जित करण्याचा निर्णय घेण्यात आला. गंगा, यमुना, गोदावरीनंतर तो मान नर्मदेला देण्यात आला. राष्ट्रपित्याच्या पवित्र अस्थीच्या विसर्जनात नर्मदेचाही सन्मान झाला व ती धन्य झाली.

माहेश्वरजवळ नर्मदेच्या पलीकडील तीरावर एक नावडाटवडी नावाचे छोटेसे गाव आहे. वायुपुराणामध्ये यास स्वर्णदीप तीर्थ म्हटले आहे. येथे शालिवाहनाचे मंदिर आहे. दक्षिणेकडील याच शालिवाहन राजांनी मातीचे शिपाई सजीव करून यवनांना एकदम नदीपार पिटाळून लावले होते ! यासाठी नर्मदेच्या दक्षिणेकडे शालिवाहन शक मानला जातो. आता भारत सरकारने शालिवाहन शक सुरू केला आहे. त्यामध्ये तिथी गणनेच्या क्रमामध्ये थोडाफार फरक केला आहे.

माहेश्वरच्या पश्चिमेस सहस्रधारा नावाचा धबधबा आहे. येथे नर्मदेच्या प्रवाहामध्ये उंच कडेकपारी आल्या आहेत. त्यामुळे नर्मदेच्या प्रवाहाच्या शेकडो धारा बनल्यामुळे त्याचा कलकल ध्वनी हा दूरवर ऐकू येतो. या उंच कड्यांमुळे माहेश्वरजवळ एक कुंड तयार झाले आहे. तेथे सदैव भरपूर पाणी असते.

असे म्हणतात, एकदा सहस्रार्जुन आपल्या राणी-बरोबर नर्मदेच्या पाण्यात जलक्रीडा करत होता. वरती म्हणजे पूर्वेकडे नर्मदेच्या उत्तर तटावर शंकराला प्रसन्न करण्यासाठी रावण तपश्चर्या करीत होता.

क्रीडा करताना सहस्रार्जुनाने नर्मदेचा प्रवाह अडवला. जेव्हा पाणी वाढत वाढत रावणाच्या आसनापर्यंत आले, तेव्हा रावण संतापला. ही खोडी कोणी काढली हे तो बघू लागला. पश्चिमेकडे खाली गेल्यावर त्याला खरी गोष्ट समजली. सहस्रार्जुनाची दृष्टी त्याच्यावर पडली. त्याला तो एक विचित्र प्राणी वाटला. कुतूहलाने त्यास पकडून मुलांना खेळण्यासाठी महालात त्याने पाठवून दिले. तेथे तो अनेक दिवस अडकून पडला होता. शेवटी पुलस्य ऋषींनी त्याला सोडवले, अशी कथा आहे.

माहेश्वरपासून ८ मैलांवर खळघाट आहे. मुंबई—आग्रा मार्ग येथूनच नर्मदेला एका पुलाने पार करून जातो. प्राचीन काळी ब्रह्माजीत याने येथे तप केले होते. या

स्थानाला कपिलतीर्थ म्हणतात.

कपिलतीर्थापासून ७ मैल पश्चिमेस धर्मपुरी आहे. स्कंदपुराण व वायुपुराणात यास महर्षी दधीचीचा आश्रम म्हटले आहे. वृत्रासुराच्या वधासाठी इंद्राने त्याच्या हाडांची मागणी केली होती, व दधीचीने प्रसन्न चित्ताने ती मागणी पुरवली होती. त्यापासून वज्र बनवून इंद्राने वृत्रासुराला मारले. असे दधीची अमर झाले.

धर्मपुरीच्याजवळ नर्मदेमध्ये एक छोटासा टापू बनला आहे. येथे शंकराचे एक सुंदर मंदिर आहे. येथेच नागेश्वर म्हणून एक स्थान आहे. तेथे बाजबहादूरची प्रेयसी रूपमतीचे गुरू राहात होते. रूपमती नर्मदेची मोठी भक्त होती. संगीतनिपुण अशी ही राजकन्या नर्मदेची अजून एक लाडकी मुलगी होय !

ती नर्मदाकाठी पाण्यात पाय सोडून बसे व मधुर आवाजात गाणे गाई. ती अत्यंत सुंदर होती. एकदा बाज-बहाद्दूर सुलतानाच्या कानी तिची सुंदर तान गेली. मुग्ध होऊन तो आवाजाचा मागोवा घेत रूपमतीपर्यंत पोहोचला. रूपचे सौंदर्य, गुण व आवाजावर मोहित होऊन त्याने तिच्याकडे प्रेमाची भीक मागितली. प्रेम केले जात नाही, ते होऊन जाते, आणि तेसुद्धा आत्म्यावर,– शरीरावर नव्हे ! हळहळू रूप बाजबहाद्दूरला भेटू लागली. त्यांच्या प्रेमाचा रंग अधिक गहिरा झाला. रूपाने बाजच्या

प्रेमाचा स्वीकार केला, परंतु एक अट घातली– ‘ नर्मदा-मैय्या सोडून दूर कुठं जाणार नाही, आणि रोज नर्मदेचेच जल प्राशन करीन.’ प्रेमासाठी मनुष्य सर्व काही करतो. मग बाज तर माळव्याचा सुलतान होता. कोणी सामान्य माणूस नव्हता. त्याच्या हुकुमावरून कुठलेही काम चुटकीसरशी होणे सहज शक्य होते. कोणा महात्म्याच्या पुण्याईने बाजच्या मांडवगड येथे एकाएकी नर्मदा उत्पन्न झाली ! त्याला रेवाकुंड म्हणतात. त्याच्या जवळच रूप-मतीचा महाल बनवला गेला. तेथून रोज ती नर्मदामैय्याचे दर्शन घेई. नर्मदेची परिक्रमा करणारे प्रवासी रेवाकुंडा-पर्यंत जातात व पुन्हा प्रवाहाबरोबर पुढे जातात.

मांडवच्या किल्ल्यात अनेक प्रेक्षणीय जागा आहेत. पूर्वीच्या काळी याला मंडपदुर्ग म्हणत असत. हे खूप मोठे नगर होते. या नगरात ७०० मंदिरे होती असे म्हणतात. तेथील किल्ल्यामध्ये भगवान रामचंद्राचे एक प्राचीन मंदिर आहे. त्यातील श्रीरामाची मूर्ती अत्यंत सुंदर आहे.

धर्मपुरीनतर कुश ऋषींची तपोभूमी, अदितीची तपस्या करणारा ऋद्धेश्वर व सूर्यवंशातील राजा ब्रह्मदत्ताची यज्ञभूमी,–उकलवाडा पार करून आपण ‘ चिटवलदा ’ला पोहोचलो. या नर्मदेच्या तीरावर अत्री, वशिष्ठ, गौतम, विश्वामित्र, जमदग्नी, भारद्वाज आदी ऋषींनी तप केले होते. आजच्या युगातही वासुदेवानंद सरस्वती यांनी

येथेच तपश्चर्या केली होती. समोर दक्षिण तटावर राजघाट आहे. तेथे १९४८ मध्ये महात्माजींच्या अस्थींचे विसर्जन झाले. येथे फेब्रुवारीमध्ये सर्वोदय मेळा भरतो. येथून तीन मैलावर दक्षिणेकडे बडवानी नावाचा प्रदेश आहे. स्वराज्यापूर्वी याच नावाच्या छोटया संस्थानची ती राजधानी होती. बडवानीच्या जवळपास अनेक दर्शनीय जागा व तीर्थे आहेत. या राजधानीजवळच्च सातपुडयाच्या पहाडात 'बावनगजाजी' नावाचे जैन-तीर्थ आहे. येथे एका पहाडाच्या एका बाजूस संपूर्ण कडाभर खोदलेली एक विशाल अशी ८४ फूट उंचीची मूर्ती खोदलेली आहे. याच पहाडावर एक मंदिरही आहे. जैन व हिंदू दोघेही तेथे श्रद्धेने येतात. हिन्दू याला दत्ताच्या पादुका म्हणतात तर जैन याला मेघनाद व कुंभकर्णाची तपोभूमी मानतात. सातपुडयाचे सर्वांत उंच शिखर येथे आहे. आकाश स्वच्छ असताना येथून 'मांडवगड' दिसू शकतो. सातपुडयाचा हा भाग गोवर्धन क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. येथे निमाडी गोवंश आहे. येथील गाय-बैल हे दूध आणि शेतीसाठी फार उत्तम मानले जातात. बैलाच्या इतर जातींपेक्षा हे बैल अधिक बलवान व श्रेष्ठ मानले जातात. तसे तर होशंगाबाद ते हिरणफाळपर्यंतचे निमाड उत्कृष्ट असतात. हा भाग त्यासाठी विशेष प्रसिद्ध आहे.

पुढे बीजरान आहे. नर्मदेचा प्रवाह येथे संकरा आहे. बीजरानामध्ये विंध्यवासिनी देवीने धर्मराज तीर्थामध्ये

धर्मराजाने आणि हिरण्यफाळमध्ये हिरण्याक्षाने तप केले होते.

यापुढे थोडे मैल नर्मदा पश्चिमेकडे वाहू लागते. तटावर आपेश्वर तीर्थ आहे. त्याची शोभा आगळीच आहे. येथे शिवाचे सुंदर मंदिर असून येथून आसपासचे दृश्य फारच सुंदर दिसते. येथे वरुणाने भगवान शंकराला प्रसन्न करण्यासाठी तप केले होते. या साऱ्या प्रदेशात दाट रान आहे.

आपेश्वरच्या पुढे सिंदूरी नावाची नदी नर्मदेस येऊन मिळते. पहाड व घनदाट अरण्यातून जवळजवळ १२ मैल ती वाहते. येथे दक्षिणतटावर शूलपाणी तीर्थ दिसते. येथे शूलपाणीचे प्राचीन मंदिर आहे. कमलेश्वर, राज-राजेश्वर आदींची मंदिरे येथे आहेत. ब्रह्मदेवाने स्थापन केलेले ब्रह्मेश्वर लिंगही येथे बघायला मिळते. याच्या दक्षिणेस शेषशायी भगवानचे मंदिर आहे.

दीर्घतपा ऋषींचा संपूर्ण कुटुंबासहित येथे उद्धार झाला. तसेच काशीराज चित्रसेनला येथेच सिद्धी मिळाली असे म्हणतात.

गरुडेश्वरावर भगवान दत्तात्रेयाचे मंदिर व वासुदेवानंद सरस्वतींची समाधी आहे. शुक्लेश्व, शुकतीर्थ, अकतेश्व, कनीली, चांदोद, शुकेश्वर व व्यासतीर्थ पार करून आपण अनसुयामाईपर्यंत पोचतो. येथे अत्री ऋषींच्या आज्ञेने देवी

अनसूयेने पुत्रप्राप्तीसाठी तप केले होते. ब्रह्मा, विष्णु, महेश या तिन्ही देवतांनी दत्तात्रेयाच्या रूपात तिचा पुत्र म्हणून जन्म घेतला होता. कंजेण येथे शकुंतलेचा पुत्र भरत याने अनेक यज्ञ केले. तसेच प्रसिद्ध सीनोरमध्ये ऐतिहासिक व धार्मिक दृष्टीने प्रसिद्ध असलेली अनेक स्थाने आहेत.

सीनोरनंतर नर्मदेच्या तटावर अनेक छोटी मोठी गावे, तीर्थे व तपश्चर्येच्या जागा आहेत. अंगारेश्वर येथे मंगलने तप करून अंगारेश्वराची स्थापना केली. वराह भगवानने पृथ्वीचा उद्धार केल्यावर निकोरा येथे तीर्थाची स्थापना केली. लाडवा येथे कुसुमेश्वरतीर्थ आहे. मंगलेश्वर येथे कश्यप कुळात जन्मलेल्या भार्गव ऋषींनी तप केले होते. शुक्रतीर्थ येथे एक प्रचंड वृक्ष आहे. कदाचित जगातला हा सर्वांत मोठा वृक्ष असेल. येथे महात्मा कबीराने थोडा काळ निवास केला होता. म्हणून यास कबीरवट म्हणतात. याच्याखाली हजारो माणसे बसू शकतील.

यापुढे जंगले, पर्वत, ओढे, नाले पार करून नर्मदा शांतपणे पुढे वाहात जाते. सागराचा किनारा थोडा दूर राहिलेला असतो.

नर्मदा येथे अधिक रुंद होते. जणू सागराच्या भेटीच्या कल्पनेने ती आनंदाने खुलली आहे असे वाटते !

यापुढे काही मैल गेल्यावर आपण भडोच येथे

पोहोचतो. येथे नर्मदा समुद्राला मिळते. हे पश्चिम रेल्वेचे एक प्रमुख स्टेशन आहे. हे नगर तीन मैल लांब व एक मैल रुंद पसरले आहे. येथे पूर्वी एक किल्लाही होता. तो सिद्धराज जयसिंहने बांधला. आज मात्र त्याचे अवशेषच दिसतात.

भडोचला भृगुकच्छ वा भृगुतीर्थ नावाचे ठिकाण आहे. येथे पूर्वी भृगुऋषीचे वास्तव्य होते.

भडोचसमोरच्या तीरावर समुद्राजवळ विमलेश्वर हे स्थान आहे. परिक्रमा करणारे येथून नावेमध्ये बसून समुद्रातून नर्मदेच्या उत्तर तटावर लोहारिया गावाजवळ उतरतात. हे अंतर १३ मैल आहे.

तसे पाहता प्रत्येक देशातील नदीला नदीला स्वतंत्र वैशिष्टय व मान असतो. परंतु आमच्या देशात नद्यांना फार मानाचे स्थान दिले आहे.

भारतीय नद्यांत नर्मदेचे आगळेच वैशिष्टय आहे. तिच्या किनाऱ्याकिनाऱ्यावरची पवित्र तीर्थे शतकांपासून अगणित स्त्री-पुरुषांना प्रेरणा देत आली आहेत व पुढेही देत राहतील. नर्मदेच्या अमृततुल्य जलाने शेकडो मैल जमीन संपन्न झाली आहे.

---

## नर्मदा : ९

नर्मदा ही भारताच्या अति प्राचीन नद्यांतील एक नदी आहे. नर्मदेच्या काठावर मानवी संस्कृतीपासून प्रगत अशा अनेक संस्कृतींचा जन्म झाला. तिच्याच जलावर त्या वाढल्या, फुलल्या, मोठ्या झाल्या व एक दिवस संपून गेल्या. नर्मदेचा इतिहासही पुरातन आहे. इतिहासाची पाने उलटताना तिने या सर्व घटना बघितल्या आहेत. त्या सर्व घटनांची आठवण करावयाची म्हटले तर मोठी पोथी तयार होईल.

पुरातन काळातील गोष्ट आहे. तलवारीच्या बळावर उभे राहिलेले हैहय साम्राज्य, त्याचा चारी बाजूंनी झालेला विस्तार, हा नर्मदेने पहिला आहे. याच नदीत हजारो हातांचा प्रचंड असा कार्तवीर्य अर्जुन अनेक वर्षे विहार करीत होता. तेव्हा नर्मदा मांत्रिकाने भारलेल्या सापाप्रमाणे अगतिक होऊन बांधली जाई. तिच्या प्रशांत जलात त्याच्या सहस्र राण्या विहार करीत असत. याच कार्तवीर्य अर्जुनाने शिवासह कैलास हालवणाऱ्या रावणाला एक महिना आपल्या कारागृहात ठेवले होते. हे सर्व नर्मदामैय्या बघत होती.

पृथ्वी २१ वेळा क्षत्रियरहित करणाऱ्या परशुरामाने हैहय नरेशाचे हात आपल्या परशूने कापले होते, तेव्हा

नर्मदेचे जल सहस्रबाहूच्या रक्ताने लाल झाले व ते पाहून नर्मदातीरावरील राजवाड्यातील राण्यांमध्ये हाहाकार माजला होता. हे भयंकर दृश्य बघून नर्मदामैय्याच्या जिवाचा थरकाप उडाला होता !

रघूचा पुत्र अज याने इंदुमतीच्या स्वयंवरासाठी राजा भोजाच्या नगरीत येता-जाता नर्मदामैय्येला ओलांडले होते व हिच्याच तटावर स्वयंवर जिकणाऱ्या राजा अजाला इतर महारथींनी बळजबरीने इंदुमतीचे हरण करण्यासाठी अडवले होते. राजा अजाने पराक्रमाने स्वयंवर जिंकले, तसेच या राजांनाही जिंकले होते. पराक्रमी अजाला अडवणाऱ्या राजांना हात हालवत परतावे लागले होते. नर्मदामैय्या अजूनही त्या गोकुळाचे व गोपींचे चित्तहरण



श्रीकृष्णाचे रुक्मिणीहरण

करणाऱ्या कृष्णकन्हैय्याला विसरली नाही. याच नर्मदेला पार करून श्रीकृष्णाने रुक्मिणीचे हरण केले.

दक्षिणेकडून उत्तरेकडे स्वारी करणाऱ्या व उत्तरेकडून दक्षिणेकडे आक्रमण करणाऱ्या अगणित फौजा या नर्मदामैय्येने पाहिल्या आहेत. हिच्याच तटावर अनेक युद्धे झाली. अनेक राजांचे जीवनमरणाचे संघर्ष तिने पाहिले आहेत.

गुप्तकाळात समुद्रगुप्ताच्या विजयी फौजेने नर्मदा ओलांडण्याचे साहस केले होते, तेव्हा अहिरांच्या राजाने त्यांच्याशी सामना केला होता. अहिर बलिदान देऊनही विजेत्या घोड्यांच्या रांगा थांबवू शकले नाहीत.

समुद्रगुप्ताचा नातू कुमारगुप्ताच्या काळी नर्मदातटीचा राजा पुष्पमित्राने स्वातंत्र्य पुकारले . . आतापर्यंत नर्मदा शकांच्या हातून सुटून गुप्तांच्या आधिपत्याखाली गेली होती. विलासी कुमारगुप्त जीवनाची अखेरची घटका मोजत असताना त्याच्या पराक्रमी पुत्र स्कंदगुप्ताने मोठ्या चातुर्याने पुष्पमित्राला जिंकले व नर्मदातटावरील प्रदेश गुप्त साम्राज्याचा भाग बनला.

शकांच्या स्वाऱ्या, त्यांची क्रूर कृत्ये नर्मदेने बघितली. अनेक वर्षांनी गुप्त साम्राज्याचा सूर्य पंजाब–माळव्याकडे वळून हूणांकडून डुबताना तिने पाहिला.



शकांच्या वाढत्या स्वाऱ्या


यशोवर्माने नर्मदेच्या थोडे दूर हूणांना पिटाळले व माळव्याच्या नव्या गुप्ताने पुन्हा नर्मदेच्या सस्यशामल भूमीवर अधिकार मिळवला. मगध व माळव्यात अंतर आहे, तसेच जुन्या व नव्या गुप्तांमध्ये अंतर आहे.

सातव्या शतकात नर्मदेच्या धारा उत्तरपथ व दक्षिण-पथाच्या मधील सीमा बनल्या. उत्तरेकडे हर्ष व दक्षिणे-कडे पुलकेशी बलवान होता. परंतु नर्मदेने सम्राट हर्षवर्धन-मध्ये एक अलौकिक महानता पाहिली. त्यामुळे पुलकेशी व हर्षवर्धनच्या लढाईचा शेवट प्रेमरज्जूच्या नव्या बंधनाने बदलला. इतिहासातील ती घटना नर्मदेला जशीच्या तशी आठवते.

नर्मदेच्या उत्तर किनाऱ्यावर हर्षाच्या शक्तिशाली सेनेने पडाव टाकले आहेत. सेनेतील उमदे घोडे खिंकाळत आहेत. हत्ती गर्जत आहेत. सैनिकांच्या आवाजाने आजू-बाजूच्या वनप्रदेशाची शांती नाहीशी होत आहे. नदीच्या दुसऱ्या तीरावर सम्राट पुलकेशी आपल्या वीर सैनिकां-बरोबर खडा आहे.

एकदम बिगुलाचा आवाज येतो. हर्षाची सेना युद्धाला तयार होते. युद्धाची नांदी होते. सर्व योद्धे मोर्च्यावर येतात. सम्राट पुलकेशीने बाणांचा वर्षाव करायला सुरुवात केली. हर्षाची सेना युद्ध सुरू करण्याच्या आज्ञेची वाट पाहात होती. बाणांचा वर्षाव असह्य झाला. हर्षाच्या सेनेचा धीर सुटून ती पळू लागली तेव्हा सेनापतीने तिला अडविले. युद्ध सुरू करण्यासाठी आज्ञा न मिळण्याचे कारण कोणाला समजेना. आपली हार होणार असे सर्वांना वाटू लागले. सेनापतीची सर्वांत वाईट अवस्था होती. सम्राट हर्षवर्धनाची ही आगळी राजनीती न समजून ते खिन्न झाले. बाणांच्या वर्षावाने धीर सुटलेल्या हर्षाच्या सेनेला अडवताना सेनापतीच्या नाकी नऊ आले. हर्षवर्धन हे सर्व पाहात होता. त्याने मनाशी निर्णय घेतला व एक नाव मागवली. तिच्यात बसून वरती सफेद झेंडा बांध-ण्यास सांगितले. सम्राटाची आज्ञा घेऊन नावाडी पैल-तीराकडे पुलकेशीच्या सेनेच्या दिशेने निघाला.

सम्राट हर्षाची पांढरा झेंडा फडकवत चाललेली नाव बघून त्याची सेना आश्चर्याने थांबून बघू लागली. त्याचे सेनापती भंडी व सिंहनाद सम्राटाच्या या विलक्षण कृती-कडे बघू लागले. त्यांना काही सुचेना.



सम्राट हर्ष तहाकरता नर्मदा पार करताना

सम्राट पुलकेशीच्या सेनेने जेव्हा सफेद झेंडा लावलेली नाव आपल्याकडे येताना पाहिली तेव्हा ते चकित झाले. त्यांनी लगेच तशी सूचना सेनापतीकडे पाठवली. सेनापतीने नाव बघताच तो तहाचा संदेश मानून युद्ध थांबवले. सेनापतीच्या आज्ञेने पुलकेशीच्या सेनेने हत्यारे खाली टाकली. सर्व सैनिक येणाऱ्या नावेकडे आश्चर्याने टकमक बघू लागले !

नाव किनाऱ्याला लागल्यावर सम्राट हर्ष खाली उतरले. सम्राट पुलकेशी त्यांना बघून आश्चर्याने म्हणाले,

" महाराज, आपण ? आता युद्ध चालू आहे व आपण संकटात उडी मारत आहात !"

" माझी युद्ध करण्याची इच्छा नाही. व्यर्थ झालेली मनुष्य व वित्तहानी मी बघू शकत नाही. मी मैत्री व तह करण्यासाठी आलो आहे !" सम्राट हर्ष हसले व म्हणाले.

ते ऐकून पुलकेशी म्हणाले,

" आपली बहीण राजश्रीनं बाणभट्टाबरोबर यापूर्वीच प्रस्ताव पाठवला आहे. परंतु हूणांना जिंकणाऱ्या हर्षाशी युद्ध करण्याची माझी इच्छा आहे. माझ्या शक्तीची मला परीक्षा बघायची आहे."

सम्राट हर्ष बाणभट्टाचे नाव ऐकून चकित झाले. राजश्रीच्या मैत्रीच्या प्रयत्नांचे त्याला कौतुक वाटले. ते

म्हणाले, " चालुक्यराज, आपण वीरपुरुष आहात. मलाही आपल्याला जिंकण्याची, जगाला जिंकण्याची प्रतिज्ञा पुरी करायची होती. पण आता जगाला शस्त्रापेक्षा प्रेम, अहिंसेनं जिंकणं योग्य आहे असं वाटतं. आपण माझ्या प्रस्तावाचा स्वीकार करा. देशाच्या ऐक्य व शांततेसाठी आपण माझे मित्र व्हा."

हर्षाला उत्तर देताना सम्राट पुलकेशीने दुःखभरल्या स्वरात म्हटले, " सम्राट हर्षाशी युद्ध करण्याची माझी इच्छा पुरी झाली नाही, तर मला अपार दुःख होईल. माझं मन मरून जाईल."

त्यावर हर्ष म्हणाला, " हे राजा, या वेळी नर्मदेचं पवित्र जल रक्तानं लाल करणं अयोग्य आहे. भारताला आज ऐक्याची गरज आहे. भारतवर्ष एक आहे. भारतवर्षावर होणाऱ्या बाहेरील शत्रूच्या आक्रमणाच्या वेळी आपण एकत्र येऊन शत्रूशी युद्ध करू. भारतातील सर्व नागरिकांत सामंजस्य हवं. यासाठी एक भाषा हवी. हे सर्व युद्धानं होत नाही. सुधारणेसाठी शांतता आवश्यक आहे." असे सांगताना हर्ष राजा भारताच्या महानतेच्या भावस्वप्नात रंगून गेला.

सम्राट पुलकेशीवर हर्षवर्धनच्या बोलण्याचा खूपच प्रभाव पडला व तो म्हणाला,

"सम्राट हर्ष, आपण ठीक सांगता आहात. युद्धानं देशाची प्रगती होत नाही, शक्तीची परीक्षाही होत नाही. ताकद–बलाची परीक्षा मन लावून काम करण्यानं होते. राष्ट्राची उन्नती युद्धानं होत नाही. शांतीनं व प्रेमानं होते. ही गोष्ट मलाही ठाऊक आहे. काळाबरोबरच्या स्वार्थी विचारानं मी थोडा अविचारी झालो होतो. माझा भ्रम तुम्ही दूर केलात." असे म्हणून त्याने सेनापतीस बोलावले.

"सेनापती, आम्ही हर्ष राजांशी तह केला आहे. आता युद्ध होणार नाही. सेनेस परत जाण्याचा हुकूम द्या." असे सांगितल्यावर लढाई थांबली. दोन्ही बाजूंच्या सेनेस तहाची बातमी कळल्यावर तिने आनंदाने जयजयकार केला !

सम्राट हर्षाचे धर्मगुरू दोन्ही राजांना आशीर्वाद दऊन म्हणाले, "आज युद्ध होता होता थांबलं आहे. अनेकांचे प्राण वाचले आहेत. अनेक स्त्रिया, माता, बहिणी यासाठी आपणास धन्यवाद देतील. शांती व अहिंसेचा जय झाला आहे. भारतवर्षाचं यामुळ कल्याण होईल. नर्मदाकाठची ही घटना इतिहासात अमर होईल. सारा देश संपन्न होवो. आपण दोघे सम्राट लोभ व हिंसेपासून दूर राहू अशी बुद्धी भगवान बुद्ध आपल्याला देवो."

आशीर्वाद घेऊन दोन्ही सम्राट आपआपल्या देशांत परत

गेले. नंतर राष्ट्रकूट व चोलापर्यंतची शक्ती नर्मदेने ओळखली. परमार राजांच्या आधिपत्याखाली नर्मदा बराच काळ राहिली. महाप्रतापी मुंज व भोज-- दोघांनी फार काळपर्यंत या प्रदेशावर राज्य केले.

त्रिपुरीच्या कलचुरींनी नर्मदा प्रदेश हे आपल्या शक्तीचे केंद्र बनवून तलवारीच्या बळावर चारी बाजूंचा प्रदेश जिंकला. नर्मदा-काठावरून पुढे प्रयाग, काशीपर्यंत त्यांनी दौड केली.

यानंतरच्या युगात लोकमाता नर्मदेने इतिहासातील अनेक घटना अनुभवल्या. त्या सर्वांचे वर्णन करणे अशक्य आहे. हो ! या सर्वांत काही घटना व व्यक्ती सदैव स्मरणात राहतील. त्यांतील एक आहे राणी दुर्गावती ! साक्षात दुर्गावतार !

नर्मदाघाटावरील गढामंडलाची राणी रणचंडी दुर्गा ! नर्मदेने आपल्या या गुणी कन्येच्या धैर्याचे, वीरतेचे खूप कौतुक केले. हिचे नाव घेतल्यावर तो सर्व इतिहास पुन्हा आठवतो.

१५४९ साल ! बघेलखंडाच्या चंदेलांमध्ये राठचे चंदेल चर्चेचा विषय झाले होते. चंदेल राजे एकाहून एक पराक्रमी होते. राठवाल्यांच्या घराण्यात लावण्यवती कन्येच्या रूपात दुर्गेचा जन्म झाला. तिच्या रूपाप्रमाणे तिचे रणकौशल्य अप्रतिम होते. गोंडवनच्या प्रतापी

संग्रामशाहाचा अस्त झाला होता. त्याचा मुलगा दलपत-शाहने पित्याची गादी संभाळली. उत्कृष्ट रूप, शौर्य, गुणाची चाह, सैन्यबळ व विशाल राज्य हे त्याचे आधार होते. दुर्गेचे कौतुक त्याने ऐकले. चंदेल व गोंडांचे वैमनस्य असल्याने मनात प्रश्नचिन्ह होते. सर्व संघर्ष विसरून दलपतशाहने विवाहाचा प्रस्ताव मांडला. गोंडांचे पूर्वपुरुष यादवराम क्षत्रियकुलोत्पन्न व त्यांची पत्नी राजपूतकन्या होती. परंतु चंदेलांनी अपमानास्पद पत्र पाठवून मागणी धुडकावून लावली. दलपतशाहचे नाव फार पूर्वीपासून दुर्गा ऐकत होती. तिने गुप्तपणे संदेश पाठवला : “ कृष्णानं रुक्मिणीला प्राप्त केलं, पृथ्वीराजानं संयोगितेला ज्या मार्गानं आपलंसं केलं, तो मार्ग आपल्याला मोकळा आहे.”

नंतर झालेल्या युद्धात राठच्या चंदेलांच्या मदतीला महोब्याचे राजे धावून आले. त्या दोघांचाही पराभव करून दलपतशाहने दुर्गावतीला सम्राज्ञी बनवले. असे दुर्गावतीचे जीवन तलवारीवर सुरू झाले ! इतरांच्या लग्नांत मङगल वाद्ये वाजतात; दुर्गेच्या लग्नात तल-वारींचा खणखणाट होऊन रक्ताचे कुंकू लावले गेले. विवाहासाठी प्रियकराला युद्धाचे आवाहन देणाऱ्या दुर्गेला त्याच्या साहसाची परीक्षा बघायची होती. पिता सांगेल त्याला आत्मसमर्पण करणे आत्म्याच्याविरुद्ध वाटत होते. प्रियकराबरोबर पळून जाणे क्षत्रिय धर्माविरुद्ध वाटत होते.

मग युद्ध करून जिंकेल तोच पती, हे योग्य ठरले. मार्कंडेय पुराणात दानवशुंभाला दुर्गेने हाच निरोप पाठवला होता.

दुर्गावतीच्या भांगात भरला गेलेला सिंदूर, तलवारींचा झंकार व रणदुंदुभीमध्ये मिसळून गेलेला शहनाईचा आवाज जीवनात फुलांची शैय्या निर्माण करू शकला नाही. विवाहाच्या चौथ्या वर्षी दुर्गेजवळ वीरनारायण नावाचा पुत्र आठवण म्हणून ठेवून तिच्या पतीचे निधन झाले. पुत्र व राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी राणीवर पडली. सती जाणे हा खरा राजधर्म होता, परतु बालकाचे संगोपन, संरक्षण आवश्यक होते. सहधर्मचारिणीची ती सहकर्मचारिणी बनली.

एक वर्ष राज्य सांभाळल्यानंतर बाजबहाद्दरची पापी नजर गोंडवनावर पडली. राजा तीन वर्षांचा, तर संरक्षक एक विधवा ! गोंडवनासारखा संपन्न प्रदेश हस्तगत करण्यासाठी याहून चांगली संधी नव्हती.

सन १५५६. बाजबहाद्दूर दुर्गादेवीकडून हरून पळाला. या पराजयाचे दुःख तो कधीच विसरू शकला नाही. १५ वर्षे योग्य प्रकारे राज्य करून दुर्गावतीने देश संपन्न केला. नर्मदातटीच्या रामनगरच्या लेखात म्हटले आहे, " दुर्गादेवी ही याचकाला पूर्ण संतोष देत असे. ती याचकाची भाग्यलक्ष्मी, सद्‌गुणांची मूर्ती व विश्वकल्याणाची सीमा होती.

तिच्या राज्यात हत्ती व रत्नांची विपुलता होती. ती प्रजापालनात अन्नपूर्णा व प्रजारक्षणात दुर्गा होती."

माणिकपुरात अकबरचा सुभेदार असिफखाँ गढा राज्यावर नजर ठेवून होता. कारणे दोन होती : (१) गढा राज्याची समृद्धी; (२) दुर्गावतीचे सौंदर्य. युद्धासाठी कारण शोधले गेले. दुर्गावतीजवळच्या पांढऱ्या हत्तीची व सिंहाची अकबराने मागणी केली. दुर्गेने दोन्ही गोष्टी देण्यास इन्कार केला. मग युद्धाची तयारी केली गेली.

सन १५६४. असिफखाँ ६ हजार स्वार, १२ हजार पायदळ व तोफखाना घेऊन गढा राज्याची राजधानी सिंगोरगडावर चालून आला.

एका बाजूला तोफखाना तर दुसरीकडे तलवार ! वीरनारायण पुरा जखमी झाला. राणी अखेरपर्यंत हत्तीवर बसून लढली. विजयाची आशा संपली. तेव्हा रणदेवतेला तिने स्वतःचे शिर अर्पण केले. वीरांगनेच्या जीवनाचे अर्घ्य नर्मदातटाला मिळाले. विंध्याद्रीच्या कुशीत बरेलाजवळ नर्मदातटावर ही गुणी कन्या धारातीर्थावर मरण पावली. तेथे आजही तिची समाधी आहे.

बरेलाहून नर्मदा पुढे जाते. इतिहासाची दोन शतके ओलांडून पुढे येते. त्या आठवणींमध्ये मैय्या स्वतःलाच विसरते !



दुर्गावती हत्तीवर बसून शत्रूशी लढत राहिली

हा महिष्मतीचा तट ! येथेच मंडनच्या घरी शुक-सारिका देववाणीमध्ये शास्त्रार्थ करत असत. कर्मकांडावर व अद्वैत वेदान्ताचे हेच स्मरणतीर्थ होय.

होळकरांच्या राज्यात यास महेश्वर म्हणत. मल्हारराव होळकरांची पुत्रवधू अहिल्यादेवीने २९ वर्षांच्या आपल्या आयुष्यात पतीनंतर शासन सांभाळले होते.

१७५४. अटकेपार झेंडा फडकवणारा पुण्याचा लोभी पेशवा राघोबा सर्व सैन्याला घेऊन महेश्वरावर चालून आला.

नर्मदा वाहात होती. उत्तर तटावर अहिल्याबाई स्त्रियांची सेना तयार करत होती. दक्षिण तटावर सुसज्ज सैन्यानिशी राघोबा उतरला. अहिल्या हीसुद्धा रेवामातेची



महाराणी अहिल्याबाई

लाडकी कन्या ! तिने राघोबाला पत्र पाठवले : "युद्धासाठी मी स्त्रियांची सेना तयार केली आहे. रणांगणावर ह्या सेनेबरोबर तुमचा सामना करण्यास मी तयार आहे. मी हरले तर होळकर राज्य आपलं होईल. माझी कोणी निंदा करणार नाही; उलट इतिहासात मी अमर होईन. कर्तव्यकर्म करत प्राण दिल्याचं समाधान मला मिळेल. परंतु समजा, आपण हरलात तर तोंड कुठं दडवाल? एखादी जागा शोधली आहे का ?"

अहिल्येच्या बुद्धिवादापुढे हार मानून राघोबा तसाच परतला. हा त्याचा नैतिक पराजय होता.

पण ही चंचल नदी एकाएकी शांत का झाली आहे ? हा तर रूपमतीचा प्रदेश. मांडवच्या प्रदेशातील आपल्या किल्ल्यात उभी राहून रूप रेवामैयाचे दर्शन घेत असेल. ही पूजनीय शांती रेवाला रूपमतीनं तर दिली नाही ?

नाही ! असे नाही ! रेवा आपल्या गानकोकिला कन्येचे– रूपचे गाणे ऐकण्यासाठी शांत झाली आहे. येथील वातावरणात संगीताचे स्वर रात्रंदिवस लहरत असतात. एक एक मधुर स्वर गुंजन करत वातावरणात लुप्त होतो. त्याला दुर्ग रोकू शकत नाही अन् हवाही थांबवू शकत नाही.

१७ मार्च १५६१. सारंगपूरच्या लढाईत बाजबहादुर हरला. त्याच्या भाग्यात ही हार कदाचित लिहिली



राणी रूपमती आणि बाजबहादुर

असेल ! या गायनप्रेमीला वाद्याऐवजी शस्त्र घेण्याची आठवण राहिली नसेल,– व तो हरला.

आदमखाँ मांडवच्या नाही तरी रूपमतीच्या लोभाने गडावर आला. ही पतिपरायणा गानलुब्धा रूप भूप-

कल्याणचे अंतिम स्वर गाऊन हिरकणी चावून काळीनिळी पडलेली त्याने पाहिली.

हो ! आणि तेच अंतिम स्वर वातावरणात ठिबकताना रेवा ऐकत असते–

कैसे बजाऊ साँज
बिन बहादुर बाज ?


रेवा वाहते आहे. एक प्रेमकहाणी संगीतरूपात येथील वातावरणात एकरूप झाली आहे. ही अशीच वाहते अनेक आठवणी जागवत–आठवत !–मनाशी अनेक सुखदु:खांचे चढउतार पाहात !

रेवामैय्या पुढे जाते आहे. पुढे ऐतिहासिक त्रिपुरी नगर आहे. येथे एक शतक कलचुरियांची राजधानी होती.

त्रिपुरा कॉंग्रेसचे इतिहासप्रसिद्ध अधिवेशन नर्मदेला आजही आठवत असेल.

याच नर्मदेने सुभाषबाबूंना ५२ हत्तींच्या रथात पाहिले आहे. त्यांची पवित्र आठवण नर्मदा विसरू शकत नाही. शेवटी खंबायतच्या आखातात खाडीत नर्मदा समुद्राला

मिळते. येथून जवळच भडोच आहे. येथे हजारो वर्षांपासून विदेशी व्यापारी, खलाशी येत होते. जहाजातून उतरणाऱ्या



भडोच बंदर

देशी–विदेशी वस्तू, धातू, दासदासी– हे सर्व अनेक वर्षे नर्मदा पाहात आहे. या मालाचा एक मोठा भाग नर्मदेच्या रस्त्याने पूर्वेकडे जातो.

# नर्मदा : ६

नर्मदा एक पहाडी नदी आहे. अनेक जागी तिची धारा फार उंचावरून पडते. तिच्या प्रवाहात अनेक जागी कडेकपारी असल्याने तिची खोली कमी झाली आहे. त्यामुळे या नदीमध्ये नावांची वाहतूक फारशी नाही. आजूबाजूचा प्रदेश पहाडी व नर्मदेचा प्रवाह बराच खाली असल्याने भोवतालचा प्रदेश फारसा समृद्ध होऊ शकत नाही. वीज निर्माण करण्यासाठी तिचा उपयोग होतो. वीज उत्पादनाच्या ७ योजना सरकार करीत आहे. नर्मदा घाटावर राजपिपला ते भडोचपर्यंत नर्मदा व तिच्या उपनद्या यांच्यावर धरणे बांधून पाणी साठवता येईल असे लक्षात आले आहे. त्यामुळे वीज, पाणीपुरवठा व दळणवळणाच्या सोई उपलब्ध होतील, व भडोच मैदानाला पुराचा धोका राहणार नाही.

आज आम्ही बघतो की, मोठ्या सडका व रेल्वे मार्गावर शहरे लवकर वसतात. कारण दळणवळण सुलभ असते. कच्चा माल कारखान्यापर्यंत व पक्का माल देशात ठिकठिकाणी पोहचवण्यासाठी ही केंद्रे उपयोगी पडतात. पूर्वी सडका व रेल्वे नसताना नद्यांतून वाहतूक होत असे. त्यामुळे नदीकिनारी मोठी शहरे वसली आहेत. नर्मदेच्या

काठावर मोठी शहरे वसल्याने अनेक नद्यांचे पाणी अशुद्ध बनले आहे. नर्मदेचे पाणी मात्र मोठी शहरे नसल्याने शुद्ध, पवित्र व आरोग्यदायी राहिले आहे. गर्दी व कोलाहल नसल्याने नर्मदा तटावर साधकांना एकान्त मिळतो. तपश्चर्येसाठी नर्मदाकाठ हा उत्तम मानला आहे.

रेवातीरे तपः कुर्यात्।


असे पुराणात म्हटले आहे.

ही झाली संस्कृती, यात्रा, इतिहास या दृष्टीने नर्मदेची माहिती. या सर्वांहून एक उपयोगी पैलू आहे, तो म्हणजे आर्थिक पैलू. प्रत्येक प्रान्तातून नदीच्या पाण्याचा शेतीसाठी व इतर कामी किती उपयोग होईल ते पाहण्यासारखे आहे.

स्वातंत्र्यानंतर सरकारने मोठ्या व उपयोगी नद्यांवर धरण-योजना आखल्या व कार्यवाहीमध्ये आणल्या. अधिक अन्न-उत्पादन हे केंद्राचे ध्येय आहे देश अन्न-धान्यासंबंधी स्वयंपूर्ण करणे, हे या योजनांमुळे शक्य होईल.

नदीच्या पाण्यावर वीज निर्माण करून ती खेडोपाडी देऊन नवीन उद्योगधंदे निर्माण करता येतील व देशात समृद्धी येईल. नर्मदेवर २ धरण-योजना पुऱ्या झाल्या आहेत. मध्यप्रदेश व गुजरात त्यामुळे प्रगतिपथावर घोड-दौड करीत आहेत. मध्य प्रदेशातील नर्मदेच्या एका उप-नदीवर एक प्रकल्प पुरा झाला आहे. होशंगाबाद येथे

नर्मदेच्या तवा व देनवा संगमावर अर्धा मैल दूर ५४२५ फूट लांब व ११४४ फूट उंच धरण बांधले आहे. धरणातून



तवा धरण योजना

६० व ६४ मैल लांब डाव्या-उजव्या बाजूला कालवे काढले आहेत. त्यामुळे ७ लाख ८७ हजार एकर जमीन भिजेल व २० हजार किलोवॅट वीज निर्माण होईल. यामुळे होशंगाबाद, नरसिंहपूर व भोपाळ जिल्ह्यांत सर्वत्र वीजपुरवठा होईल.

या योजनेवर २७ कोटी १० लाख रुपये खर्च झाले. तवा योजनेतील पाण्याच्या उपयोगाने मध्य प्रदेशाचा कायापालट होईल व आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगतीस जोर येईल.

दुसरी योजना गुजराथ येथे भडोच जिल्ह्यातील राज-पिपला तालुक्यात नवगावजवळ आहे. येथे नर्मदेवर ४६०० फूट लांब बांध घालून २६४ मैल लांब कालवे निघतील. या योजनेवर ४३ कोटी रुपये खर्च येईल व गुजरातमधील ११ लाख एकर जमीन भिजेल.

नवा योजनेचा फायदा मध्यप्रदेश व गुजरात राज्याला मिळेल. या योजनेचे उद्‌घाटन करताना महामंत्री कै. पंडित नेहरू म्हणाले होते--

" आमच्या देशातील जीवनात नर्मदेला फार महत्त्व आहे. नवा योजना ही महत्त्वाच्या योजनांतील एक आहे. त्यामुळे दोन राज्यांना फायदा होईल. दोन्ही राज्यांना समान फायदा ही जनतेच्या प्रेमाची– एकतेची खूण आहे. येथील हजारो नागरिकाच्या आकांक्षांची परिणती म्हणजे ही योजना आहे. या योजनेने विकासाचा नवा अध्याय सुरू होईल. "

७९८६७ भू-प्रवास
५३४ २.२.७३

# उपसंहार

नर्मदामातेच्या या कथेमध्ये धार्मिक, ऐतिहासिक अशा अनेक कथाचा संग्रह आहे. गंगा नदी दरवर्षी हिच्यामध्ये स्नान करण्यासाठी येते. ती काळ्या गाईच्या रूपाने येते व सफेद होऊन जाते, असा अद्यापही लोकांचा विश्वास आहे ! कोण जाणे या कथेमध्ये सत्य किती आहे ते ! परंतु प्रत्येक भाविकाचा नर्मदा-तटाभोवती गुंफलेल्या ऐतिहासिक कथांवर सहज विश्वास बसतो. नर्मदेच्या प्रवाहाइतकाच या गोष्टीवर विश्वास ठेवून तो नर्मदेला श्रद्धेने प्रणाम करतो, व त्याच भक्तीने, श्रद्धेने कावेरी नदीच्या यात्रेची तयारी करू लागतो.

१८६५२

REF BK-0018692